


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ७८ * नांदेड * मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीवेळी मंत्री शंभूराज देसाईंना पोलिसांची मारहाण

## नीलम गोऱ्हेंकडून सातारा एसपी तुषार दोषींच्या निलंबनाचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष निवडणुकीवेळी पोलीस प्रशासन आणि मंत्री शंभूराज देसाई यांच्यात धक्काबुक्की झाली. या प्रकरणानंतर साताऱ्याचे पोलीस अधीक्षकांना निलंबन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मोठा गोंधळ उडाला होता. पालकमंत्री शंभूराज देसाई आणि कॅबिनेट मंत्री मकरंद पाटील यांना आपल्या सदस्यांना सभागृहात नेण्यासाठी पोलीस आणि प्रशासनाशी झुंज द्यावी लागली. या धक्काबुकीत शंभूराज देसाई जखमी झाले, तर मकरंद पाटील यांना २०-२५ पोलिसांनी घेरल्याची घटना घडली होती. प्रशासकीय यंत्रणेचा वापर करून भाजपने आपला अध्यक्ष निवडून आणल्याचा आरोप करण्यात येत आहे. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान झालेल्या अभूतपूर्व गोंधळाची विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी सातारा पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे आदेश दिले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश पुण्याच्या विभागीय आयुक्तांना दिले आहेत. तर मंत्री जयकुमार गोरे यांनी या निलंबनाला कडाडून विरोध केला. यामुळे विधानपरिषदेत सत्ताधाऱ्यांमध्येच आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडल्याचे दिसून आले.

जयकुमार गोरे म्हणाले की, सभापती महोदया तुम्ही निर्देश देण्यापूर्वी वस्तुस्थिती जाणून घेणे गरजेचे होतं, तत्पूर्वी तुम्ही निर्देश दिले. ज्याचं अपहरण झालं तो राष्ट्रवादीचा कार्यकर्ता आहे. त्यांच्या कुटुंबियांनी अपहरण झाल्याचा गुन्हा नोंद केला होता. कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्याचे करण्याचे काम कुणी केले. चार हजार लोकं जिल्हा परिषदेत घुसले ते कुणी आणले? याचे देखील उत्तर द्यायला हवे, असे त्यांनी म्हटले.

जयकुमार गोरे पुढे म्हणाले की, सभापती महोदया तुम्ही माझ म्हणणं ऐकून घ्या ना. तुम्ही ऐकून घेत नाहीत. मी देखील वस्तुस्थिती सांगत आहे. तुम्ही माझ म्हणणं ऐकून घ्या, असे म्हटले. यावर नीलम गोऱ्हे यांनी सभागृहात पोलीस घुसले होते की नव्हते ते तुम्ही सांगा? असे म्हटले. यावर जयकुमार गोरे म्हणाले की, सभापती महोदय तुम्ही कोणत्या प्रकारे वस्तुस्थिती जाणून न घेता एका अधिकाऱ्याला निलंबित करता कसं काय? तो आयपीएस दर्जाचा अधिकारी आहे. तुम्ही असा कसा निर्णय घेतला? तुमच्या निर्णयावर हरकत नाही. मात्र, जो निर्णय झाला आहे तो चुकीचा आहे. कार्यकर्ते कोणी आणले? भाजपवर कसं काय आरोप करता? तिथे जबरदस्ती सीइओ यांना बैठक कोणी घ्यायला लावली? असे म्हणत त्यांनी निलंबनाला कडाडून विरोध केल्याचे पाहायला मिळाले.

# महापालिका स्थायी समिती सभापतीपदाची गाडीवालेंना संधी तर बालकल्याण सभापती सोनी, उपसभापतीपदी लांडगे

## आज औपचारिक घोषणा होणार



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महापालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी एकमेव विरेंद्रसिंघ गाडीवाले यांचा अर्ज आल्यामुळे त्यांची निवड निश्चित झाली आहे. यामुळे गाडीवाले यांना पुन्हा एकदा सभापतीपदाची संधी मिळाली आहे. सोबतच शिक्षण, महिला व बालकल्याण सभापतीपदी सदिच्छा सोनी तर उपसभापतीपदी निरंजना लांडगे यांची निवड निश्चित झाली आहे. केवळ निवडीच्या घोषणेची औपचारिकता मंगळवार, दि. २४ मार्च रोजी होणाऱ्या सभेत करण्यात येणार आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे ४५ नगरसेवक निवडून आले व त्यांना शिवसेनेच्या ४ व अपक्ष १ अशा ५ नगरसेवकांची साथ मिळाली. त्यामुळे मनपात भाजप शिवसेनेचे ५० नगरसेवक झाले आहेत. दरम्यान १६ मार्च रोजी महापालिकेची सर्वसाधारण सभा झाली. त्यात ८ स्वीकृत सदस्य, १६ स्थायी समिती सदस्य तर महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी १० जणांची निवड घोषित करण्यात आली. त्यानंतर महापालिकेच्या तिजोरीची चावी म्हणजेच स्थायी समिती सभापती पदावर कोणाची वर्णी लागणार, याची उत्कंठा लागली होती. स्थायी समिती सभापती पदासाठी विरेंद्रसिंघ गाडीवाले यांचे नाव सर्वांत आघाडीवर होते. तर सुमित मुथा, दिपाली मोरे, कविता गड्डम यांची नावे चर्चिली जात होती. कविता मुळे यांना महापौर केल्यामुळे स्थायी समितीवर सुद्धा महिलाच येणार, असा कयास राजकीय तज्ज्ञ लावीत होते. परंतु सर्वांचे कयास मागे पाडत विरेंद्रसिंघ गाडीवाले यांच्याच गळ्यात स्थायी समिती सभापतीची माळ पडणार हे भाकित खरे ठरले आहे. सोमवार, दि. २३ मार्च रोजी सभापतीपदासाठी गाडीवाले यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला आहे.

सोबतच शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी सदिच्छा सोनी तर उपसभापतीपदी निरंजना लांडगे यांची नावे निश्चित मानली जात आहे. या तिन्ही पदाधिकाऱ्यांच्या नावांची केवळ औपचारिक घोषणा शिल्लक राहिती असून ठरल्याप्रमाणे दि. २४ मार्च रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सभेत या नावांची घोषणा करण्यात येणार आहे.

# आता १४ किलोऐवजी ८ ते १० किलो एलपीजी भरणार

## घरगुती गॅस सिलेंडरबाबत सरकारचा निर्णय



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** घरगुती गॅस सिलेंडरच्या वितरणात महत्वाचा बदल करण्याचे सरकारने ठरवले आहे. घरगुती वापराचा गॅस सिलेंडर नागरिकांना आता अर्ध्याच वजनाचा मिळणार आहे. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर १४.२ किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येतो. मात्र, आता हा घरगुती वापराचा गॅस ८ ते १० किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येणार आहे, असा निर्णय सरकारने घेतला आहे.

युद्धामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या भरुन तयार असलेले १४.२ किलोचे सिलेंडर संपल्यानंतर नवीन सिलेंडर आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्यात येणार आहेत. यापुढे गॅस सिलेंडर कमी वजनाचे असल्याने ते साहजिकच कमी दिवस पुरणार आहेत. त्यामुळे सामान्य घरातील दैनंदिन गणित बिघडणार आहे. यावर सामान्य नागरिक कशाप्रकारे व्यक्त होणार, हे बघावे लागेल. याशिवाय, कमी वजनाच्या या घरगुती गॅस सिलेंडरची किंमत किती असणार, याकडेही सगळ्यांच्या नजरा आहेत.

युद्ध संपल्यानंतरही या सुविधा पूर्ववत होण्यासाठी बराच वेळ जावा लागेल. त्यामुळे पुढील काही महिने जगभरात गॅसची टंचाई असेल, असा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारने आवश्यक ती पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

# इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ले पाच दिवस लांबणीकर, ट्रम्प यांची घोषणा

## इराणसोबत दोन दिवसांपासून सकारात्मक चर्चा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या वीज प्रकल्पांवर आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर होणारे हल्ले तात्पुरते स्थगित करीत पाच दिवस लांबणीवर टाकण्यात आल्याचे जाहीर केले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात दोन दिवस झालेल्या चर्चे नंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे ट्रम्प यांनी सांगितले.

ट्रम्प यांनी सांगितले की, संरक्षण विभागाला पाच दिवसांसाठी सर्व लष्करी हल्ले थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ट्रम्प यांच्या मते, इराणसोबत सुरू असलेल्या वाटाघाटींमधील सकारात्मक कल लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असून, या काळात चर्चा सुरूच राहील. ट्रम्प यांनी सांगितले की, जर वाटाघाटी यशस्वी झाल्या, तर मध्य-पूर्वेतील सध्याचा तणाव संपवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले जाऊ शकते. खरे तर, दोन दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी इराणला धमकी दिली होती की, जर ४८ तासांच्या आत होर्मुझची सामुद्रधुनी उघडली नाही, तर ते इराणच्या वीज प्रकल्पांवर मोठा हल्ला करतील.

दुसरीकडे, ट्रम्प यांच्या धमक्यांना डगमगून न जाता जर विद्युत प्रकल्पावर हल्ला झाला तर संपूर्ण आखातातील विद्युत प्रकल्प आणि जल शुद्धीकरण शिल्लक ठेवणार नाही, असा इशारा दिला होता. तुम्ही आमची शाळा, रुग्णालये टार्गेट केली, पण आम्ही केली नाहीत. मात्र, विदयुत प्रकल्पाला हात घातला, तर आम्ही तेच करू असा इशारा दिला होता. इस्त्रायलने गॅस प्रकल्पावर आणि अणुस्थळांवर हल्ला केल्यानंतर इराणने काल इस्त्रायलच्या अणुस्थळ असलेल्या शहरात बॅलेस्टिक मिसाईली डागल्या होत्या. हा इस्त्रायलच्या आयर्न डोमचा पोलखोल करणारा हल्ला होता.

दरम्यान, ट्रम्प यांनी रविवारी रात्री ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टारमर यांच्याशी फोनवर मध्य-पूर्वेतील वाढत्या संघर्षावर चर्चा केली. ही माहिती ब्रिटिश पंतप्रधानांच्या कार्यालयाने दिली. निवेदनात म्हटले आहे की, दोन्ही नेत्यांनी सद्यस्थितीवर, विशेषतः जागतिक जहाजवाहतूक पुन्हा सुरू करण्यासाठी होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याच्या गरजेवर चर्चा केली.

# कोल्हापूर ज्योतिबा मंदिरात पुजाऱ्यांकडून भाविकांना मारहाण, ३० जणांवर गुन्हा

**कोल्हापूर (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील ज्योतिबा मंदिर परिसरात काल परिते गावातील काही नागरिक दर्शनासाठी गेले होते. यावेळी पुजारी आणि या नागरिकांमध्ये तुंबळ हाणावरी झाल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला. ज्योतिबा मंदिरात १५ ते २० पुजाऱ्यांनी मिळून दोन भाविकांवर लाथा-बुक्क्यांनी हल्ला केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी आता पुजारी आणि भाविकांसह ३० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आता कोरोनाच्या परिस्थितीसारखं आपण तयार राहायला हवं

## नरेंद्र मोदींचं थेट संसदेतून देशवासियांना आवाहन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जागतिक परिस्थिती वेगाने बदलत आहे, ज्यामुळे देशाची अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणावर संभाव्य परिणाम होऊ शकतो. संभाव्य जागतिक इंधन संकट, जागतिक पुरवठा साखळी आणि स्थिरतेसंदर्भात चर्चा केली. तसेच कोरोनाच्या परिस्थितीसारखं आपण तयार राहायला हवं, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेतून केले आहे.



आपल्या भाषणात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सध्याची जागतिक परिस्थिती, भारताची रणनीती आणि सरकारची भूमिका स्पष्ट केली. यापूर्वी, सरकारने संकेत दिले होते की ते मध्य-पूर्वेतील संकटाबाबत सतर्क असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. गेल्या रविवारी, पंतप्रधान मोदींसोबत झालेल्या एका उच्चस्तरीय मंत्रिमंडळ बैठकीत पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा भारताच्या तेल आयातीवर, खतांच्या पुरवठ्यावर आणि व्यवसायावर होणाऱ्या संभाव्य परिणामांवर चर्चा झाली. या बैठकीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणसोबतच्या अमेरिका-इस्त्रायल संघर्षातून निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता कायम राखण्यासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याव्यतिरिक्त, भविष्यात शेतकऱ्यांना खतांची उपलब्धता अखंडित राहावी यासाठी खतांच्या पर्यायी स्रोतांवरही विचारमंथन करण्यात आले.

# लहान येथे डीजे व भोंगेमुक्त गाव करण्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील लहान येथे डीजे व भोंगेमुक्त करण्याचा ठराव ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशिव इंगळे यांच्या पुढाकाराने घेतला असून या निर्णयाचे अनेकांनी स्वागत केले आहे.

विद्यार्थ्यांना अभ्यास करताना होणारा त्रास टाळण्यासाठी मंदिर, मस्जिद, बुद्ध विहार, वाढदिवस यासह विविध कार्यक्रमासाठी डीजे व भोंगे यातून होणारे ध्वनी प्रदुषण टाळण्यासाठी तसेच विद्यार्थी व अबाल वृध्दांना होणारा त्रास लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने डीजे व भोंगे बंद करण्याचा ठराव मंजूर केला आहे.

ग्रामपंचायतीने डीजे व भोंगेमुक्त घेतलेल्या ठरावाची प्रत पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्यासह अनेक शासकीय कार्यालयाला देण्यात आले आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी



सरपंच सदाशिव इंगळे, उपसरपंच मेहबुब शेख, तंटामुक्ती अध्यक्ष गोविंद हरकरी, माजी सरपंच अमोल इंगळे, ग्रामविकास अधिकारी रविकांत क्षीरसागर, पोलीस पाटील आनंद इंगळे, ग्रामपंचायत सदस्य आनंद लोणे, मंगेश कुराडे, बसवेश्वर संस्थांचे अध्यक्ष अवधूत वखरे, विलास स्वामी, केशव हारकरी, दत्ता इंगळे, बालाजी शिवणकर, सतीश रणखांब, नितीन बोले आदींसह अनेकजण उपस्थित होते.




# यावर्षी पहिल्यांदाच राम नवमीनिमित्त शोभायात्रेत नृसिंह अवताराची झाकी

## ७००० स्वयंसेवकांचा शोभायात्रेत सहभाग, श्रीराम जन्मोत्सव समितीकडून माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** रामनवमीनिमित्त शहरातून काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेत हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करत हा दिवस हिंदू एकता दिवस म्हणून पाळला जावा असे आवाहनही संयोजकांनी केले आहे. या शोभायात्रेत पहिल्यांदाच नृसिंह अवताराची झाकी तयार करण्यात येणार असून या शोभा यात्रेला सुरक्षा म्हणून सात हजार स्वयंसेवक तैनात करण्यात येणार असल्याची माहिती श्रीराम जन्मोत्सव समितीच्यावतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

सन २००८ पासून सुरू करण्यात आलेल्या रामनवमी जन्मोत्सवाला दिवसेंदिवस नांदेडकरांचा वाढता



प्रतिसाद मिळत आहे. शोभायात्रेत नांदेडसह आजूबाजूच्या ग्रामीण भागातील हिंदू बांधव मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. ही शोभायात्रा दि. २६ मार्च रोजी दुपारी बारा वाजता रामघाट येथील राम मंदिर येथे आरती करुन पालखी काढून सदरील पालखी रेणुका माता मंदिर गाडीपुरा येथे येणार आहे. या ठिकाणी मूर्ती अनावरण झाल्यानंतर शोभा यात्रेला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे. या शोभायात्रेत विविध प्रकारच्या झाक्या, ढोल पथके, भजनी मंडळ सहभागी होणार आहेत. शोभायात्रेत राम-रावण वध, नृसिंह अवतार यासोबतच भोलेनाथ, राम दरबार, अयोध्या राम मूर्ती, उत्सव मूर्ती असे विविध देखावे तयार करण्यात येणार आहेत. तसेच महिला-भगिनी लाठीकाठीची कसरत तसेच तलवारबाजी दाखविणार आहेत. या शोभायात्रेदरम्यान रस्त्यात पडलेला कचरा उचलण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक तैनात करण्यात आले आहेत. विविध धार्मिक, सामाजिक संघटनांच्यावतीने मिरवणूक मार्गावर स्टॉल लावून थंड पेय, फळ आदी वाटप करण्यात येणार आहेत. जवळपास १७२ ठिकाणी शोभा यात्रेचे स्वागत करण्यात येणार असून जागोजागी आतिषबाजी करण्यात येणार आहे. या शोभायात्रेला मोठ्या प्रमाणात हिंदू बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीराम जन्मोत्सव समितीचे डॉ. रमेश नारलावार, गणेशसिंह ठाकूर, मोहन पाटील, संतोष कालू ओझा, उदयसिंह बिसेन, किशोर वाघदरीकर यांनी केले आहे.

# शेअर बाजारात पुन्हा भूकंप, सेन्सेक्स १८०० अंकांनी घसरला

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय शेअर बाजारात पुन्हा घसरण सुरु झाली आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी ५० मध्ये २ टक्क्यांची घसरण झाली आहे. सेन्सेक्स १८३७ अंकांनी कमी होत किंवा २.४६ टक्के घसरण होऊन ७२६९६ अंकांवर पोहोचला आहे. निफ्टी ५० निर्देशांक ६०२ अंकांची घसरण होऊन २२५१२ अंकांवर बंद झाला. बीएसई १५० मिडकॅप आणि बीएसई २५० स्मॉलकॅप निर्देशांकात ४ टक्क्यांची घसरण झाली आहे.

शेअर बाजारात सुरु असलेल्या घसरणीमुळं बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य घसरलं. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य शुक्रवारी ४२९ लाख कोटी रुपयांवर होतं. त्यात १४ लाख कोटी रुपयांची घसरण झाली आहे. आज बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४१५ लाख कोटींवर आलं आहे.

शुक्रवारी शेअर बाजारात थोडी तेजी दिसून आली होती. मात्र, आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजार पुन्हा कोसळला. या घसरणीमागे अमेरिका आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धाची वाढलेली तीव्रता हे आहे. अमेरिकेनं इराणला होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यास ४८ तासांची मुदत दिलेली आहे. तर, इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी फक्त दुश्मन देशांसाठी बंद असल्याचं म्हटलं आहे.

भारतीय रुपयाचं होणारं अवमूल्यन हे देखील शेअर बाजारातील घसरणीला कारणीभूत आहे. भारतीय रुपया २६ पैशांनी कमजोर होत डॉलरच्या तुलनेत ९३.९७ रुपयांवर पोहोचला आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

## आजच्या तरुणांची दिशा आणि दशा

प्राचीन काळात अन्न, वस्त्र, आणि निवारा या मूलभूत गरजांवरच मानवी जीवनाचा आधार होता. मात्र, आधुनिक युगात या गरजांमध्ये पैसा या महत्त्वाच्या घटकाची भर पडली आहे. जगण्यासाठी लागणाऱ्या वस्तू आणि सेवांसाठी पैसा अपरिहार्य झाला आहे. त्यामुळेच पैसा कमावणे, त्याचे योग्य व्यवस्थापन करणे, आणि भविष्यासाठी बचत ठेवणे प्रत्येकासाठी अत्यावश्यक बनले आहे. पण आजची तरुण पिढी मात्र आर्थिक नियोजनाच्या अभावामुळे अनिश्चिततेच्या गर्तेत सापडत आहे. सिनेमांचे अंधानुकरण करून आजची तरुणाई मोठ्या पगाराच्या नोकऱ्या, आलिशान जीवनशैली, महागड्या वस्त्र आणि गाड्या या गोष्टींना जीवनाचं परमोच्च यश मानते. मात्र, आर्थिक नियोजनाची जाण नसल्याने आणि बचतीला दुय्यम स्थान दिल्यामुळे हीच पिढी आर्थिक ताण-तणावाने ग्रस्त होत आहे. सतत हाय-प्रोफाइल जीवनशैली टिकवण्यासाठी नोकऱ्या बदलणं, अधिक पैसे कमावण्याचा अट्टाहास करणं, आणि यासाठी मानसिक शांतता गमावणं, हे या पिढीचं वास्तव बनलं आहे. जागतिक स्तरावरील अहवालांनुसार आर्थिक चिंता भेडसावणाऱ्या देशांच्या यादीत भारत अग्रेसर आहे, आणि यात तरुण पिढीचा वाटा मोठा आहे. बजेट तयार करणं, गुंतवणूक करणं, आणि कर्ज व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत आर्थिक कौशल्यांचा अभाव या समस्येचं मूळ आहे. आपल्या शालेय किंवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमात आर्थिक साक्षरतेचा पुरेसा समावेश नसल्याने मुलं शिक्षण पूर्ण करून मोठ्या पदांवर काम करू लागतात, पण त्यांना कमावलेल्या पैशाचं व्यवस्थापन कळत नाही. गेल्या काही वर्षांत आयटी आणि खासगी क्षेत्रातील संधींमुळे तरुणांना मोठे पगार मिळू लागले. परंतु, महागड्या वस्तूंचा पाठपुरावा आणि स्टेट्स सिम्बॉल टिकवण्याच्या हव्यासामुळे या पिढीने बचतीकडे दुर्लक्ष केलं आहे. परदेशवारी, महागड्या गाड्या, आणि दिमाखदार जीवनशैलीच्या नादात अनेक तरुण आर्थिक बेशिस्तीच्या सापळ्यात अडकले आहेत. याशिवाय नोकरीची असुरक्षितता हा आणखी एक मोठा प्रश्न आहे. स्पर्धात्मक नोकरी बाजारात ले-ऑफ किंवा नोकरी जाण्याची भीती सतत मनावर असते. यामुळे तरुणांमध्ये नैराश्य, उच्च रक्तदाब, आणि इतर आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. काही प्रकरणांत कामाच्या ताणामुळे तरुणांनी आत्महत्या केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. आयुष्यात पैसा महत्त्वाचा आहे, पण नातेसंबंध, मानसिक शांती, आणि सामाजिक जबाबदारी यांना बाजूला सारून फक्त पैशांवर लक्ष केंद्रित करणं या पिढीचं मोठं वैफल्य आहे. व्यावहारिकदृष्ट्या विचार करता, पैसा कमावणे हे जीवनाचं साधन असलं पाहिजे, पण ते साध्य नाही. मात्र, आपल्या अपेक्षांनुसार जीवन जगताना आजची तरुणाई नातेसंबंध विसरत आहे. तरुणाईला आर्थिक स्वावलंबन देण्यासाठी काही मूलभूत उपाय गरजेचे आहेत जसे शाळा आणि महाविद्यालयांमध्ये आर्थिक साक्षरता, बजेट तयार करणं, बचत, गुंतवणूक, आणि कर्ज व्यवस्थापन शिकवणं आवश्यक आहे. यामुळे तरुणांना पैशांचं योग्य व्यवस्थापन करता येईल. मुलांना आर्थिक शिस्त लहानपणापासून शिकवणं ही पालकांची जबाबदारी आहे. खर्चाच्या मर्यादा, बचतीचं महत्त्व, आणि गरज व हौस यातील फरक समजावून दिल्यास मुलांमध्ये योग्य आर्थिक दृष्टिकोन तयार होईल. फॅशन आणि स्टेट्स सिम्बॉलच्या हव्यासापेक्षा दीर्घकालीन आर्थिक स्थैर्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन दिलं पाहिजे. मोठ्या पगाराच्या नोकऱ्या करणाऱ्या तरुणांनी आर्थिक सल्लागारांकडून मदत घेऊन गुंतवणूक आणि बचत यासाठी योग्य धोरण ठरवावं. असं करणं गरजेचं आहे, कारण आजची तरुण पिढी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे, पण भावनिक आणि मानसिक स्थैर्याच्या बाबतीत भरकटलेली आहे. पैसा हा जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे, पण तोच आयुष्याचा केंद्रबिंदू बनवणं चुकीचं ठरत आहे. आर्थिक शिस्त आणि योग्य नियोजन केल्यास तरुणांना त्यांची स्वप्नं पूर्ण करता येतील आणि ताणमुक्त जीवन जगता येईल. पालक, शैक्षणिक संस्था, आणि समाज यांचं एकत्रित प्रयत्नाने तरुणाईला योग्य मार्गदर्शन केलं, तर ही पिढी केवळ यशस्वीच नव्हे, तर समाधानी जीवन जगू शकेल. आर्थिक शिस्तीचं कोंदण लहानपणापासून दिल्यास तरुणाईला उज्ज्वल भविष्याचा पाया घालता येईल.

# श्रद्धेच्या आड दडलेले अंधश्रद्धेचे वास्तव : कायद्याची अंमलबजावणी आणि जबाबदारीचा प्रश्न



महाराष्ट्र ही सामाजिक प्रबोधनाची, विवेकनिष्ठ विचारांची आणि परिवर्तनवादी चळवळींची भूमी म्हणून देशात एक वेगळी ओळख निर्माण करून आहे. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक इतिहासात अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रीदमन आणि अन्यायांविरुद्धचा लढा हा केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष कृतीतून उभा राहिलेला दिसतो. महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक विचार मांडत समाजातील अज्ञानाला आव्हान दिले. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घालत अंधश्रद्धा आणि स्त्रीदमनाला प्रत्यक्ष धक्का दिला. राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाच्या धोरणांद्वारे समतेचा मार्ग मोकळा केला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि मानवी सन्मान या मूल्यांना घटनात्मक अधिष्ठान दिले. या वैचारिक परंपरेतूनच पुढे अंधश्रद्धेविरोधी चळवळी उभ्या राहिल्या आणि त्यातून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात आला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा म्हणजे केवळ कायदेशीर चौकट नसून तो समाजाच्या विवेकनिष्ठतेचा आणि प्रबोधनपर भूमिकेचा पुरावा आहे. श्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या भोंदूगिरीला, फसवणुकीला आणि शोषणाला थांबवण्यासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. परंतु, वास्तवातील काही घटनांमुळे हा प्रश्न उभा राहतो की, कायदा असूनही अशा प्रकारच्या घटना का घडतात? विशेषतः महिलांचे श्रद्धेच्या नावाखाली होणारे लैंगिक शोषण हे केवळ गुन्हेगारी प्रकरण नसून ते समाजाच्या मानसिकतेवर, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि सत्तेच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील भेद समजून घेणे ही या चर्चेची पहिली पायरी आहे. श्रद्धा ही मानवी जीवनाचा सकारात्मक भाग आहे. ती व्यक्तीला मानसिक आधार देते, जीवनातील संकटांमध्ये धैर्य देते आणि नैतिक मूल्यांची जपणूक करते. परंतु जेव्हा श्रद्धा विवेकशून्य बनते, प्रश्न विचारण्याची क्षमता हरवते आणि ती अंधानुकरणात परिवर्तित होते, तेव्हा ती अंधश्रद्धा बनते. अंधश्रद्धा ही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर, विचारशक्तीवर आणि सन्मानावर आघात करते. ती अनेकदा भीती, असुरक्षितता आणि अज्ञान यांच्यापासून जन्म घेते आणि त्यातून शोषणाला खतपाणी मिळते.

अलीकडील काळात काही घटनांमध्ये श्रद्धेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप समोर आले आहेत. या घटना केवळ व्यक्तीगत गुन्ह्यांच्या चौकटीत मर्यादित नसून त्या समाजातील अंधश्रद्धेच्या खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रतीक आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला दैवी शक्ती असलेली म्हणून सादर करते, चमत्कारांचे दावे करते आणि लोकांच्या समस्यांवर 'दैवी उपाय' सुचवते, तेव्हा काही लोक त्या व्यक्तीवर आंधळा विश्वास ठेवतात. या विश्वासाचा गैरफायदा घेत काही भोंदू लोक महिलांचे मानसिक, आर्थिक आणि लैंगिक शोषण करतात.

महिलांच्या संदर्भात अंधश्रद्धेचा प्रश्न अधिक गंभीर ठरतो. पितृसत्ताक समाजरचना, शिक्षणाचा अभाव, आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक दबाव यामुळे अनेक महिला अशा भोंदू व्यक्तींच्या जाळ्यात अडकतात. त्यांच्या वैयक्तिक समस्या; जसे की आरोग्याच्या अडचणी, कौटुंबिक ताणतणाव, संततीप्राप्तीचे प्रश्न यावर उपाय शोधताना त्या अशा लोकांकडे वळतात. हीच परिस्थिती शोषणाला कारणीभूत ठरते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा या कायद्याने अशा प्रकारच्या कृत्यांना स्पष्टपणे गुन्हा घोषित केले आहे. जादूटोणा, बुवाबाजी, खोटे चमत्कार, फसवणूक, तसेच शारीरिक आणि मानसिक छळ यांना या कायद्यात बंदी घालण्यात आली आहे. तरीही, अशा घटना घडत राहतात, याचा अर्थ कायद्याच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आहेत.

'कायद्याची अंमलबजावणी कोणी करायची?' हा प्रश्न येथे केंद्रस्थानी येतो. सैद्धांतिकदृष्ट्या, ही जबाबदारी पोलीस, प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांच्यावर असते. परंतु, या यंत्रणा स्वतंत्र आणि निष्पक्ष असल्या पाहिजेत. जर त्यांच्यावर राजकीय दबाव असेल किंवा त्यांच्यात प्रामाणिकतेचा अभाव असेल, तर त्या प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत.

याठिकाणी सत्ताधाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जर सत्तेतील काही लोकच अशा भोंदू व्यक्तींना संरक्षण देत असतील, त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास टाळाटाळ करत असतील किंवा राजकीय फायद्यासाठी त्यांचा वापर करत असतील, तर ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक ठरते. अशा वेळी केवळ कायद्याचा अपमान होत नाही, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही ढासळतो.

'याला जबाबदार कोण?' या प्रश्नाचे उत्तर बहुआयामी आहे. सर्वप्रथम, जबाबदारी त्या व्यक्तीची आहे जी अंधश्रद्धेचा वापर करून शोषण करते. दुसरे म्हणजे, त्या यंत्रणांची जबाबदारी आहे ज्या अशा कृत्यांना रोखण्यात अपयशी ठरतात. तिसरे म्हणजे, सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे, ज्यांनी कायद्याची निष्पक्ष अंमलबजावणी सुनिश्चित करणे अपेक्षित आहे. आणि शेवटी, समाजाचीही जबाबदारी आहे, जो अशा व्यक्तींना अंधश्रद्धेने पूजतो.

समाजातील अंधश्रद्धा ही केवळ अज्ञानामुळे निर्माण होत नाही. ती भीती, असुरक्षितता आणि आशेच्या शोधातूनही निर्माण होते. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि लोकांना तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

महिलांच्या सशक्तीकरणालाही येथे विशेष महत्त्व आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक जागरूकता यामुळे महिलांना अशा शोषणापासून वाचवता येऊ शकते. त्याचबरोबर, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि आधार मिळवून देणेही आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी अशा घटनांचा निष्पक्षपणे पर्दाफाश केला पाहिजे आणि समाजामध्ये जागरूकता निर्माण केली पाहिजे. सामाजिक संघटना आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळींनीही अधिक सक्रिय भूमिका घेणे आवश्यक आहे.

शेवटी, हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर समाजाच्या आत्मपरीक्षणाचा आहे. आपण खरोखरच पुरोगामी आहोत का? की आपण अजूनही अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकलेले आहोत? जर श्रद्धेच्या नावाखाली शोषण होत असेल आणि आपण त्याकडे दुर्लक्ष करत असू, तर आपली पुरोगामी ओळख ही केवळ दिखावा ठरते.

महाराष्ट्राच्या प्रबोधनपर परंपरेला खऱ्या अर्थाने जपायचे असेल, तर केवळ कायदे बनवून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी, समाजामध्ये विवेकाची रुजवणूक आणि प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. तेव्हाच अंधश्रद्धामुक्त, न्याय्य आणि खऱ्या अर्थाने पुरोगामी महाराष्ट्र घडू शकतो.

-डॉ. राजेंद्र बगाटे
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# क्षयरोग निर्मूलन : सामुदायिक जिम्मेदारी

२४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. हा दिवस प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. रॉबर्ट कॉक यांचा जन्मदिवस आहे. ज्यांनी क्षयरोगास कारणीभूत असलेल्या मायकोबॅक्टेरियम ट्यूबरक्युलोसिस या जंतूचा शोध लावला, त्याप्रीत्यर्थ हा दिवस आपण जागतिक क्षयरोग दिन म्हणून सर्वत्र साजरा करतो.


भारतात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम १९६२ साली सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाचा सर्वसमावेशक आढावा घेतला असता असे आढळले की, आपण निश्चित केलेले उद्देश साध्य झाले नाहीत म्हणून नवीन शिफारसीनुसार कार्यक्रमात काही बदल करून १९९२ साली टप्प्याटप्प्याने भारतात सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू करण्यात आला व यामध्ये प्रत्यक्ष निरीक्षणाखाली रुग्णांना औषधोपचार ही पद्धती अवलंबण्यात आली. सुमारे दोन दशकांहून अधिक काळापासून RNTCP नंतर आता NTEP हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.

**आकडेवारी :** जागतिक पातळीवर व भारतामध्ये क्षयरोग हा मृत्यूच्या कारणांमध्ये पहिल्या दहा आजारांपैकी एक आहे. एकाच जंतूंमुळे मायकोबॅक्टरियम ट्युबर क्युर्लोसिस होणाऱ्या मृत्यूमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. जागतिक क्षयरोग रिपोर्ट २०१८ नुसार जगामध्ये एकूण शंभर लक्ष क्षयरुग्ण आहेत त्यापैकी २७ टक्के क्षयरुग्ण एकट्या भारतात आहेत. जगात दर दोन पॉईंट पाच मिनिटाला एक रुग्ण क्षयरोगाने मरण पावतो.

आपल्या देशात ४०% हून अधिक लोक क्षयरोगाने संसर्गित आहेत. परंतु या सर्वांना क्षयरोग झाला आहे असे म्हणता येत नाही. पण भविष्यात यापैकी दहा टक्के लोकांना क्षयरोग होण्याची शक्यता असते आणि HIV बाधित रुग्णांमध्ये क्षयरोग होण्याची शक्यता दहा टक्के लोकांना असते. भारतात दरवर्षी २८.४ लाखांहून अधिक नवीन रुग्ण आढळून येतात. क्षयरोग पुन्हा उद्‌भवण्याचे प्रमाण भारतात १२ ते १७ टक्के असे आहे. ही बाब निश्चितच गंभीर अशी आहे .

**क्षयरोगाची लक्षणे :** दोन आठवड्यांपेक्षा जास्त दिवसांचा सततचा खोकला. दोन आठवड्यांपेक्षा जास्त दिवसांचा ताप, वजन कमी होणे, भूक मंदावणे, थुंकीतून रक्त पडणे.

यासोबतच अति जोखमीच्या व्यक्तीमध्ये एक दिवसाचा जरी खोकला असला तरी त्यास संशयित रुग्ण म्हणून तपासणी करावी लागते. उदाहरण एचआयव्ही बाधित व्यक्ती, बेडका दूषित



क्षयरुग्णाच्या सहवासातील व्यक्ती तसेच आपण अन्य काही वर्गातील व्यक्तींना अती जोखमीच्या समूहांमध्ये समाविष्ट करतो. उदाहरणार्थ मधुमेह किडनीचे रुग्ण, कर्करोगी, फुप्फुसाचे आजार असलेले रुग्ण, कुपोषित बालके व व्यसनाधीन व्यक्ती आदी.

**औषधोपचार :** निदान झालेल्या क्षयरुग्णांकरिता दररोज ठराविक मात्रेत औषधांचा एकत्रित मिश्रणाच्या गोळ्या वजन गटानुसार उपलब्ध आहेत व त्या निरीक्षणाखाली रुग्णांना दिल्या जातात. साधारणपणे एका क्षयरुग्णाचा संपूर्ण औषधोपचार सहा ते आठ महिन्यांसाठी असतो. संपूर्ण औषधी नियमितपणे घेतल्यास रुग्ण १०० % क्षय मुक्त होतो. म्हणून सर्वांनी कफ एटीकेट्स गांभीर्याने पाळावेत. जसे की, सार्वजनिक ठिकाणी न थुंकणे व खोकताना शिंकताना स्वच्छ रुमालाचा वापर करणे ज्यामुळे हवेतून प्रसार होणाऱ्या क्षय रोगाबाबत अन्य संसर्गजन्य आजार यावर आपणास मात करता येईल व संसर्गजन्य व्हायरसच्या प्रसारालाही आळा बसेल .

**साध्य उद्दिष्टे व आव्हाने :** क्षयरोग निर्मूलनाच्या अनेक उपक्रमांमुळे आपली उद्दिष्टे साध्य होण्यास खूप मदत झाली आहे. उदाहरणार्थ युनिवर्सल एक्सेस टीबी केअर, नोटिफिकेशन ऑफ डेव्हलपमेंट ऑफ स्टँडर्ड इन इंडिया, खाजगी क्षेत्राचा सहभाग, सूचना व संदेश तंत्रज्ञानाद्वारे रुग्णांच्या औषधोपचाराचे प्रत्यक्ष वेळेवर सनियंत्रण इत्यादी त्याचप्रमाणे दाद न देणाऱ्या क्षयरोगासाठीचे निदान व औषधोपचार, मल्टी ड्रग रेझिस्टंट रुग्णांसाठी नवीन औषधी जसे बेडाक्युलीन व डेलामॅनीड ही सर्वोत्तम औषधी आहेत. या सर्वांसोबत निक्षय पोषण आहार योजना, क्षयरोगाविषयी जनजागृती व प्रचाराची साधने यामध्येही खूप प्रगती झाली आहे. उपचाराच्या अनेक सोयी असतानाही काही रुग्ण असे असतात की, ते आपल्या यंत्रणेपासून दूर राहतात. अशा रुग्णांचा समाजात शोध घेणे व त्यांना उपचाराखाली आणून रोग प्रसार थांबविणे ही काळाची गरज आहे. दिलेल्या उद्देशानुसार आपण सर्वांना २०२५ पर्यंत क्षयरोग निर्मूलन करावयाचे आहे म्हणून प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे की, कोणताही व्यक्ती ज्यास क्षयरोगाची लक्षणे आढळून आल्यास, त्यास जवळच्या सरकारी दवाखान्यात तपासणी करून घेण्यास प्रवृत्त करावे.

खाजगी डॉक्टरांनी पण नवीन क्षयरुग्ण शोधून त्यांची नोंद निक्षय प्रणालीमध्ये करण्यास मदत करावी, जेणेकरून कुठलाही क्षयरुग्ण निदान व उपचारापासून वंचित राहणार नाही. म्हणून म्हणावेसे वाटते. क्षयरोग निर्मूलन ही सामुदायिक जबाबदारी आहे. क्षयरोग निर्मूलनासाठी यावर्षीचे घोषवाक्य YES ! WE CN END TB. असे आहे.

-डॉ. संतोष सूर्यवंशी
प्र. जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र,
नांदेड

# आभासी अभिव्यक्तीचे वास्तव आणि त्याचे परिणाम



शतकापूर्वी अल्बर्ट आइनस्टाईन यांनी व्यक्त केलेल्या तंत्रज्ञानाच्या प्रभावाविषयीच्या भाकीताची प्रचिती आजच्या डिजिटल युगात आपण अनुभवत आहोत. इंटरनेट आणि सोशल मीडियाने अभिव्यक्तीला अभूतपूर्व संधी दिल्या असल्या, तरी यामुळे वैचारिक खोली आणि भाषिक समृद्धीवर गंभीर परिणाम होत आहेत.

आज प्रत्येक माणसाला आपले मत मांडण्यासाठी अनेक मंच उपलब्ध आहेत. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम आणि यूट्युबसारख्या प्लॅटफॉर्मवर लोक मुक्तपणे आपले विचार मांडत आहेत. मात्र, अभिव्यक्तीच्या या असीम स्वातंत्र्याला काही ठिकाणी उथळपणाचा शाप मिळाला आहे. बहुतेक लोक फक्त 'लाइक-डिसलाइक', 'कट-कॉपी-पेस्ट' आणि 'फॉरवर्ड' या पातळीपर्यंतच आपली सर्जनशीलता सीमित करत आहेत. व्यक्त होण्याच्या नादात भाषेचे सौंदर्य, विचारांची खोली आणि सखोल चर्चा हरवत चालली आहे.

याचा समाजावर खोल परिणाम होत आहे. विचार करण्याची सवय कमी झाली आहे, कारण झटपट माहिती शोधता येते. गुगलवरील तत्काळ उपलब्ध माहितीमुळे लोकांना काही लक्षात ठेवण्याचीही आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे वाचन, चिंतन आणि मनन करण्याच्या प्रक्रियेत मोठी कपात झाली आहे. संशोधन, आकलन आणि सखोल अभ्यासाऐवजी पटकन तयार उत्तरांवर समाधान मानण्याची वृत्ती वाढली आहे.

सोशल मीडियावर अभिव्यक्तीचे जे लोकशाहीकरण झाले आहे, त्याने अनेकदा अराजकता निर्माण केली आहे. एखाद्या विषयावर उत्तेजित प्रतिक्रिया देण्याची घाई, योग्य-अयोग्य याचा विचार न करता कोणतीही गोष्ट फॉरवर्ड करण्याची प्रवृत्ती आणि सखोल चर्चेपेक्षा ट्रेंडिंग विषयांवर आधारित चर्चेचा उथळपणा ही आजच्या युगाची नवी समस्या बनली आहे.

मैत्रीचे संदर्भही बदलले आहेत. पूर्वी मित्रपरिवार म्हणजे जीवाभावाची नाती असायची, संवादातून विश्वास निर्माण व्हायचा. आता सोशल मीडियावरील 'लाइक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या संख्येवर मैत्रीचे मोजमाप केले जात आहे. मात्र, हे संबंध किती टिकाऊ आणि विश्वासार्ह असतात, हा मोठा प्रश्न आहे. आभासी नातेसंबंधांचे स्वरूप हे वरवरचे आणि अनेकदा स्वार्थी असते. त्यामुळे डिजिटल माध्यमांमुळे खऱ्या संवादाची जागा एका यांत्रिक संवादाने घेतली आहे.

अभिव्यक्तीचे हे नवे स्वरूप तंत्रज्ञानाच्या हातात सापडले असून, मोठ्या प्रमाणावर समाजाच्या मानसशास्त्रीय अभ्यासासाठी याचा उपयोग केला जात आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म्सचे अल्गोरिदम आपल्या वैयक्तिक पसंती, सवयी, सामाजिक आणि राजकीय विचारसरणी यावर परिणाम घडवू लागले आहेत. त्यामुळे आपले विचार कसे असावेत, आपण कोणत्या बाजूने झुकावे याचे अप्रत्यक्ष नियंत्रण हे तंत्रज्ञान कंपन्या घेत आहेत.

या परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा? यासाठी आपण वैचारिक स्वातंत्र्याची खरी जाणीव ठेवायला हवी. आभासी दुनियेत स्वतःला हरवून न देता, वास्तव जगातील संवाद आणि विचारांची खोली जपली पाहिजे. माहितीच्या ओघात वाहून जाण्याऐवजी ती तपासण्याची आणि योग्य-अयोग्य याचा अभ्यास करण्याची सवय लावली पाहिजे. सोशल मीडियाचा वापर संयमाने आणि जबाबदारीने करावा, जेणेकरून अभिव्यक्तीचे खरे मूल्य अबाधित राहील आणि विचारसंपन्न समाज निर्माण होईल.

-मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# बीएलओ व बीएलए यांच्या समन्वयातून प्री एसआयआर मॅपिंग ३१ मार्चपूर्वी पूर्ण करा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले





**नांदेड (प्रतिनिधी)–** नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे विशेष सखोल मतदार यादी पुनर्निरीक्षण कार्यक्रम २०२५ च्या निमित्ताने नांदेड दक्षिण आणि नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील सर्व राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, जिल्हा सचिव, तालुकाध्यक्ष तालुका सचिव, सर्व नगरसेवक, आजी,माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, रास्त भाव दुकानदार, पोलीस पाटील, निवडक बीएलओ आणि सर्व पर्यवेक्षक यांची कार्यशाळा सोमवारी पार पडली.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बोलताना सांगितले, अद्याप निवडणूक आयोगाने एसआयआर कार्यक्रम जाहीर केला नसला तरी त्या कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून सर्व मतदारांची २००२ च्या मतदार यादीशी मॅपिंग करणे आवश्यक आहे. यासाठी निवडणूक विभागाने पर्यवेक्षक आणि बीएलओ यांची यंत्रणा कामाला लावली आहे. त्या माध्यमातून सर्व मतदारांनी आपले नाव २००२ च्या मतदार यादीशी मॅप करून घेणे गरजेचे आहे.

सदर काम केवळ बीएलओ यांच्या प्रयत्नातून पूर्ण होणे थोडे कठीण आणि वेळखाऊ असल्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी आपापले बुथ लेवल एजंट (बीएलए) प्रत्येक मतदान केंद्रावर नेमल्यास बीएलओ आणि बीएलए यांच्या समन्वयातून मॅपिंगचे हे काम सुलभ आणि लवकर पूर्ण करणे शक्य होणार आहे. यासाठी रास्त भाव दुकानदार, पोलीस पाटील यांची सुद्धा मदत घेण्यात येणार असून, मॅपिंगची टक्केवारी ३१ मार्चपर्यंत ९५ टक्केपर्यंत नेणे गरजेचे आहे. यासाठी सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने यांनी एसआयआर नेमके काय आहे? ते का आवश्यक आहे? ते कसे करायचे आहे? याबद्दलचे सविस्तर मार्गदर्शन उपस्थितांना केले. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे मतदान नोंदणी अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी उपस्थित सर्व पर्यवेक्षक, पोलीस पाटील आणि रास्त भाव दुकानदार या सर्वांना पीपीटीच्या माध्यमातून एसआयआर निमित्त करावयाच्या कार्यवाहीचे प्रत्यक्ष सादरीकरण करून समजावून सांगितले. तसेच या संपूर्ण कार्यक्रमाच्या संदर्भात राजकीय पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांना असणाऱ्या शंका कुशंका, विविध समस्या-प्रश्नांचे समाधान डॉ. खल्लाळ यांनी केले.

यावेळी मॅपिंगचे अति उत्कृष्ट काम करणारे बीएलओ आणि त्यांचे पर्यवेक्षक यांचा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सदर कार्यशाळेवेळी नांदेड उत्तरचे मतदार नोंदणी अधिकारी कोळेकर, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार संजय वारकड, गट विकास अधिकारी, नांदेड मनपाचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

या कार्यशाळेचे यशस्वी संयोजन नायब तहसीलदार नितीशकुमार बोलोलू यांनी केले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन अक्षय ढोके यांनी केले तर आभार नायब तहसीलदार इंद्रजीत गरड यांनी मानले.

# पीपल्स कला-संस्कृती महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील पीपल्स कॉलेजमध्ये पीपल्स कला-संस्कृती महोत्सव नुकताच पार पडला. या महोत्सवाचे उद्घाटन गझलकार प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. मुकुंद राजपंखे म्हणाले की, घर नव्याने पुन्हा बांधले पाहिजे, जळमटांना जुन्या जाळले पाहिजे, लोक येतील धावून शब्दांवरी, वागणे आपले चांगले पाहिजे. समाजातील जुनी जडणघडण, जातीय जळमटे व चुकीच्या परंपरा दूर करून नव्या विचारांची निर्मिती करण्याचा संदेश त्यांनी तरुणांना दिला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात स्वतःच्या विचारशक्तीचा योग्य वापर करण्याचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्रा. सौ. श्यामल पत्की ह्या होत्या. तर प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर, उपप्राचार्य डॉ. अशोक सिद्धेवाड, सांस्कृतिक समन्वयक डॉ. दत्ता यादव तसेच कार्यकारिणी सदस्य नौनिहालसिंग जहागीरदार, प्रा. डॉ. यशपाल भिंगे, प्रा. विलास वडजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी आपल्या कवितांमधून भावनिक व सामाजिक आशय मांडला. माझ्या बापाचे पाय काट्याकुट्याचे माहेर, मालकाचा जुना उतारा माझ्या बापाला आहेर..., मला वाटले जे तुम्हाही कळू दे, तुझा गंध माझ्या घरीही दरवळू दे..., माया पातळ करू नकोस... अशा ओळींमधून त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनाला स्पर्श केला.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक करत या महोत्सवातून विविध कला-आविष्कार साकार होतील, असा विश्वास व्यक्त केला. अध्यक्षीय समारोपात प्रा. सौ. श्यामल पत्की यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# जागतिक वन दिनानिमित्त वृक्ष लागवड




**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक वन दिनानिमित्त वनपरिक्षेत्र कार्यालय प्रादेशिक हदगाव अंतर्गत वनपरिमंडळ मनाठा येथील मौजे सायाळवाडी येथे जागतिक वन दिनानिमित्त वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी वन वणव्याबद्दल जनजागृती करण्यात आली.

यावेळी उपवनसंरक्षक श्रीमती मनीषा पाटील, सहायक वनसंरक्षक (तेंदू व कॅम्पा) भारत खेलबांडे, किशन खंदारे, वनपाल भारत काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ मनाठा अंतर्गत नियतक्षेत्र चोरोंबा ना. मधील मौजे सायाळवाडी येथे गावातील मंदिर परिसरात वृक्षारोपण करून जागतिक वन दिन साजरा करण्यात आला. गावातील लोकांना वृक्षलागवडीबद्दल माहिती देण्यात आली व वृक्ष लागवड करण्यात आले.

या कार्यक्रमात बबन देशमुखे पोलीस पाटील, गावातील युवक, महिला, पुरुष उपस्थित होते. यावेळी वनरक्षक एच. डी. गवळी, एन. बी. गिते, एस. बी. वाघमारे, नितीन अंकलगे, एस. बी. पवळे, वॉचमन राठोड, अनिल मुळेकर, सोनाळे आदी उपस्थित होते.

# स्वारातीम विद्यापीठात 'प्रगत आण्विक जीवशास्त्र' प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सात दिवसीय प्रगत आण्विक जीवशास्त्र प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन सोमवार, दि. २३ मार्च रोजी जैविकशास्त्र संकुलात संपन्न झाले. यावेळी यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करून अद्ययावत राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी व्यक्त केले.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (भारत सरकार) तसेच हाय मीडिया लॅबोरेटोरिज, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी हे सात दिवसीय प्रशिक्षण शिबीर २३ ते ३० मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते झाले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात प्रगत तंत्रज्ञानाची भर पडावी व त्यांनी आधुनिक संशोधन तंत्र आत्मसात करावे या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या विषयातील नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा असून आधुनिक संशोधन तंत्रज्ञानाचे ज्ञान असल्यास विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील आव्हाने समर्थपणे पेलता येतील, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून हाय मीडिया लॅबोरेटोरिज, मुंबई येथील मनोजकुमार बोरसे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर जैविकशास्त्र संकुलाचे संचालक व शिबीर संयोजक डॉ. बी. एस. सुरवसे तसेच सहसंयोजक डॉ. ए. पी. पाठक उपस्थित होते.

या प्रशिक्षण शिबिरामध्ये पेशीमधून शुद्ध डीएनए वेगळा करणे, डीएनएमध्ये अचूक बदल करणे, डीएनए परिवर्तन, डीएनएच्या अनेक प्रती तयार करणे, एसडीएस-पेजद्वारे प्रथिनांचे विभाजन, आयन एक्सचेंज क्रोमॅटोग्राफी, अफिनिटी क्रोमॅटोग्राफी तसेच सदर्न ब्लॉटिंग यांसारख्या विविध प्रगत आण्विक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एस. सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिभा ढवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन समरीन पठाण यांनी केले.

हे प्रशिक्षण शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. हेमलता भोसले, आयोजन सचिव डॉ. उमेश धुलधज, प्रतिभा ढवळे, डॉ. सुनील हजारे तसेच डॉ. मिलिंद गायकवाड, विद्या सुकरे, प्राजक्ता चांडोळकर, रुबिया शेख, गोविंद सूर्यवंशी, वसुधा कोडगिरे, खाजा मोईनुद्दीन, राजू शेरे, सुशील खरवडकर आणि राजकुमार हस्सेकर प्रयत्न करीत आहेत.

## एमपीडीएअंतर्गत बालाजी जाधव हर्सुल कारागृहात स्थानबद्ध

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सतत गुन्हे करून शांतता भंग करणारा सराईत बालाजी जाधव याची एमपीडीए अंतर्गत कारवाई करत हर्सुल कारागृहात रवानगी केली आहे. या आरोपी संदर्भात प्रस्ताव पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे पाठवला होता.

नांदेड जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी एमपीडीए अंतर्गत सन २०२५ वर्षामध्ये ३७ सराईत गुन्हेगारास कारागृहामध्ये स्थानबद्ध करण्यात आले आहे. सन २०२६ या चालू वर्षामध्ये एकूण आठ सराईत गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यात आले आहे. अनेक गुन्हेगार रडारवर आहेत.

# देववाडी येथे भविष्य निधीतर्फे मोफत आरोग्य शिबीर संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** ए थ्री एन अ‍ॅग्रो भारत यांच्या संस्थेच्या वतीने कळमनुरी तालुक्यातील देववाडी (वरूड) येथे मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. या आरोग्य शिबिरात जवळपास २५० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली व त्यांना मोफत औषधी वाटप करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख म्हणून दिलीपराव देसाई (माजी जि. प. सदस्य डोंगरकडा) तसेच आरोग्य अधिकारी म्हणून डॉ. सुधाकर लोमटे, वरूड ग्रामपंचायत कार्यालय येथील ग्राम रोजगार सेवक गजानन पिंपरे आदी उपस्थित होते.

या संस्थेचे विभागीय अधिकारी गंगाधर हणमंते, जिल्हा प्रतिनिधी राज इंगोले, तालुका प्रतिनिधी राहुल इंगोले, शंकर इंगोले, चंद्रकला वाघतकर, सुकेशनी झोडपे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात परिसरातील जवळपास २५० रुग्णांची आरोग्य तपासणी केली. तसेच या संस्थेमार्फत त्यांना मोफत औषधी देण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन स्वप्नपूर्ती सेवाभावी संस्थेचे वरिष्ठ सौ. विशाखा संदीप लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन वरूड ग्रामपंचायत येथील संगणक परिचालक प्रभाकर भंडारे यांनी केले, तर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी वरूड येथील समस्त गावकरी मंडळींनी सहकार्य केले.

## हदगाव येथे उद्या रोजगार मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व वैराग्य मूर्ती दत्ताबापू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार २५ मार्च २०२६ रोजी वैराग्य मूर्ती दत्ताबापू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हदगाव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी बुधवार २५ मार्च सकाळी १० वा. वैराग्य मूर्ती दत्ताबापू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हदगाव येथे उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

## जात पडताळणी कार्यालयात शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जात पडताळणी कार्यालयात भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांना अभिवादन करण्यात आले.

सोमवार, दि. २३ मार्च रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड येथे अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी मुकुंद मुळे, सिद्राम रणभीरकर, विठ्ठल आडे, शिवाजी देशमुख, सोनू दरेगावकर, बाबू कांबळे, मनोज वाघमारे, रोहन देशमुख यांच्यासह कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांनी हसतमुखाने फासावर चढून केवळ मृत्यूलाच नाही तर जुलमी ब्रिटिश सत्तेलाही आव्हान दिले होते. त्यांचे विचार आणि देशप्रेम आजही प्रत्येक भारतीयाच्या हृदयात क्रांतीची ज्योत तेवत असल्याचे उपस्थित मान्यवरांनी विचार मांडताना सांगितले.

# धनेगाव/मुजामपेठ येथील गृहनिर्माण संस्था रद्द झाल्यानंतरही विक्री व्यवहार

## संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील धनेगाव/मुजामपेठ अंतर्गत सर्वे नं. १२१ प्लॉट क्र. ३६८ ची जय हनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था म. बळीरमपूर या संस्थेची नोंदणी सन २०१७ मध्ये रद्द झालेली असताना विक्री व्यवहार सुरू आहे. या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

१३ फेब्रुवारी २०२६ रोजी दस्त क्र. १७४१/२०२६ दुय्यम निबंधक नांदेड -१ येथे बोगस चेअरमन बनून कन्व्हेन्स डीड करणारे, विक्री करणारे व खरेदीदार यांच्यावर प्लॉटधारकाची फसवणूक, शासनाची फसवणूक केल्यामुळे सखोल चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी माधव उमाजी झुरेकर यांनी केली आहे. या गंभीर बाबीकडे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे.

अर्जदार हा रा. कुपटी (बु) पो. इस्लापूर ता. किनवट येथील रहिवासी असून, रोजमजुरी करून आपल्या कुटुंबियांसह राहतो.हनुमान सोसायटी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था मर्यादित बळीरामपूर/धनेगाव ता. जि. नांदेडचे तत्कालीन प्रथम चेअरमन जयराम बाबा सोनटक्के यांचे निधन झाल्यानंतर त्यांचा मुलगा गंगाधर सोनटक्के यांनी लिपीक, सह जिल्हा निबंधक विसावानगर या दोघांनी मिळून पुणे येथील इंडस टॉवर लि. कार्यालय न.२१० ई-कोरमारवल विमाननगर पुणे ४११०१४ (महाराष्ट्र) या कंपनीने तक्रारदार यांच्या वडिलाच्या प्लॉटवर खोदकाम केल्याची माहिती मिळाली म्हणून त्यांनी दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी पोलीस अधीक्षक नांदेड यांना तक्रार दिली आणि लगेच ओळखीच्या वकीलामार्फत कोर्टात दाद मागितली. यामधील दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी तक्रार अर्जातील सय्यद महेमूद सय्यद अहेमद साब यांची पत्नी, यांनी जय हनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था म. बळीरामपूर /धनेगाव या संस्थेची नोंदणी सन २०१७ मध्ये रद्द झालेली असताना दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुय्यम निबंधक नांदेड-१ येथे दस्त क्र.१७४१ / २०२६ रोजी कन्व्हेन्स डीड केली. या प्रकरणात गुंतलेल्या गैर अर्जदारांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर अर्जदार व शासनाच्या फसवणुकीबद्दल फौजदारी गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# नरसी येथील श्रीराम मंदिराच्या २४ व्या वर्धापनदिन सोहळ्यास प्रारंभ

**नरसीफाटा (प्रतिनिधी)–** येथील ख्यातकीर्त श्रीराम मंदिर देवस्थानाच्या २४ व्या वर्धापन सोहळ्यास गुरुवारी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. गुढीपाडव्यापासून रामनवमीपर्यंत चालणाऱ्या या भक्तिमय सोहळ्याने पंचक्रोशीतील भाविकांना भक्ती, श्रद्धा आणि संस्कृती परंपरेचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे.

हनुमान गड संस्थान, तेलूर येथील प्रख्यात शिवकथा प्रवक्ते स्वामी ब्रम्हानंद सरस्वती महाराज यांची या उत्सवात उपस्थिती राहणार असून, त्यांच्या वाणीतून ते शिवपुराण कथेच्या माध्यमातून धर्म आणि राष्ट्रभावनेचा जागर करणार आहेत.




गुढी पाडव्याच्या दिवशी पहिल्याच पर्वात प्रवचन देताना धर्माचं रक्षण करणाऱ्यांनाच मतदान करा, असा थेट संदेश देत त्यांनी समाजाला सजगतेचे आवाहन केले. त्यांच्या प्रवचनामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला असून, दररोज मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत आहेत.

यंदा विशेष म्हणजे संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठ गमनाच्या ३७५ व्या स्मृतिनिमित्त श्री तुकाराम गाथा पारायण सोहळ्याचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ७ ते ११ गाथा पारायण, दुपारी १ ते ५ शिवमहापुराण कथा, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री कीर्तन असा दैनंदिन कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडत आहे.

या शिस्तबद्ध आणि सातत्यपूर्ण धार्मिक कार्यक्रमांमुळे भाविकांना आध्यात्मिक समाधान लाभत असल्याचे सांगण्यात आले.

गुरुवारी १९ मार्चपासून सुरू झालेल्या कीर्तन-प्रवचन मालिकेत ह.भ.प. भगवान महाराज मुगावकर, चंद्रशेखर महाराज देगलूरकर, त्र्यंबकअप्पा स्वामी नंदगावकर, मैनाताई हिप्पळनाळीकर आदी नामवंत कीर्तनकारांनी आपल्या ओजस्वी वाणीतून भक्तांना मंत्रमुग्ध करणार आहेत. पुढील दिवसांत प्रेमजुती परमेश्वर महाराज शाहापूरकर, नरसिंग महाराज केरूरकर आदींची कीर्तने होणार असून, भक्तांसाठी ही एक अध्यात्मिक मेजवानीच ठरत आहे.

२५ मार्च रोजी लक्ष्मणशक्ती मुक्तोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार असून, २६ मार्च रोजी ब्रम्हानंद महाराज तेलूरकर, निरंजन महाराज अंभईकर यांच्या उपस्थितीत विशेष धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे. या सोहळ्याची सांगता २ एप्रिल रोजी हनुमान जयंतीच्या दिवशी सूर्योदयाच्या मंगल क्षणी होणार आहे.

या सोहळ्यात मृदंगाचार्य नामदेव पांचाळ, गणेश पांचाळ, रवी गौड, हरिओम राजेलवाड यांच्यासह अनेक वादकांनी आपल्या कलाविष्काराने कार्यक्रमाची शोभा वाढवली आहे. शिवाजी वडजे, रंगनाथ महाराज राजेलवाड, तुकाराम वडजे यांसारख्या भजनी गायकांनी सादर केलेल्या सुमधुर भजनांनी वातावरण अधिकच भक्तिरसात न्हाऊन निघाले.

परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पवित्र सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवार

# व्यवस्थापन संत्राबागेचे...



**उन्हाळ्यातील प्रखर उन्हामुळे संत्रा बागेचे फार नुकसान होते. अतिउष्ण तापमानामुळे झाडे वाळण्याचे किंवा मरण्याचे प्रमाण वाढते. अचानक वाढणाऱ्या तापमानामुळे मोठ्या प्रमाणात फळगळ होते. नवीन लागवड केलेली बाग, मृग बहार घेण्यासाठीची बाग आणि आंबिया बहाराची फळे असलेली बाग असे लागवडीनुसार विभाजन केले जाते. उन्हाळ्यातील अतिउष्ण तापमानामध्ये बागांची योग्य काळजी घेणे आवश्यक असते.**

» **नवीन लागवड केलेली बाग :** प्रखर उन्हामुळे लहान झाडांची पाने करपल्यासारखी होऊन गळतात. कलमाच्या शेंड्याकडील भाग वाळायला लागतो. जमिनीत पुरेसा ओलावा उपलब्ध नसल्यास प्रखर उन्हाच्या झोताने कलमाची साल फाटायला सुरुवात होऊन झाड मरते. उपाययोजना करताना बागेच्या दक्षिण-पश्चिम बाजूने झाडांपासून ६ मीटर अंतरावर वारारोधक झाडांची लागवड करावी. यामध्ये शेवरी, शेवगा, हेटा, निलगिरी इत्यादी झाडांची लागवड करता येते. वारारोधक झाडांमुळे उन्हाळ्यातील सोसाट्याच्या उष्ण वाऱ्यापासून लहान झाडांचे संरक्षण होते. प्रखर उन्हापासून कलमांच्या संरक्षणासाठी कलमाभोवती वाळलेले गवत, तुराटे, पराटे, बोरू किंवा कडब्याचा वापर करून सावली करावी. झाडाभोवती कमीत कमी १० सें.मी. उंचीचे वाळलेल्या पालापाचोळ्याचे आच्छादन टाकावे. जमीन वखरून घ्यावी. ज्यामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी होतो. झाडांना बोर्डो पेस्ट लावावी. कलमाच्या जोडाखाली आणि वरील भागावर गवत बांधावे. उन्हाळ्यात झाडांना पाण्याची जास्त गरज असते. त्यामुळे खोडापासून १० सें.मी. जागा सोडून सबलीने तिरकस छिद्र करून त्यात पाणी टाकावे. (छिद्र २० ते २५ सेंमी खोलीचे असावे किंवा मडका पद्धतीने पाणी द्यावे.)

» **मृग बहार घेण्यासाठीची बाग :** मृग बहार घेण्यासाठी उन्हाळ्यात तडण द्यावी लागते. उन्हाळ्यात तापमान ४७ ते ४८ अंश सेल्सिअसपर्यंत जाते. या काळात संत्र्याची झाडे वाढ थांबवून विश्रांती घेत असतात. विश्रांतीच्या काळातील अतिउष्ण तापमानामुळे झाडे वाळण्याचे किंवा मरण्याचे प्रमाण वाढते. या काळात जमिनीचा मगदूर आणि उष्णतामान यांचा योग्य समन्वय असणे आवश्यक असते. योग्य काळजी न घेतल्यास उन्हामुळे झाडाची साल वाळून तडकते आणि झाड मरते. मृग बहार घेण्यासाठीच्या झाडांवरील फळे २५ ते ३० मार्चपर्यंत झाडावरून पूर्णपणे काढून टाकावीत. फळे तोडल्यानंतर ताबडतोब बागेला पाणी न दिल्यास झाडांना ताण बसतो. याचा झाडांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. फळे तोडणीनंतर झाडावर येणारी सल व वाढलेल्या फांद्या काढून टाकाव्यात. कापलेल्या भागावर होणारा बुरशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी झाडावर कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जमिनीच्या प्रकारानुसार झाडाला योग्य ताण देणे आवश्यक असते. झाडांना जास्त ताण बसून झाडे मरू शकतात. हलक्या ते मध्यम जमिनीत एक महिना तर भारी जमिनीत दीड महिन्याचा ताण द्यावा. ताण देण्याच्या दोन ते तीन दिवसआधी झाडांना शेवटचे पाणी द्यावे. त्यानंतर उभी व आडवी वखरणी करून पाणी देणे बंद करावे. वखरणी केल्याने जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन थांबते. तसेच जमिनीला भेगा पडून जळावा फुटण्यापासून संरक्षण होते. जमीन भुसभुशीत राहिल्यामुळे मुळांना भरपूर प्रमाणात ऑक्सिजन मिळतो. तसेच, जमिनीतील कीटक उघडे पडून उन्हाच्या प्रखरतेने मरतात. झाडाच्या बुंध्यालगत आच्छादन म्हणून वाळलेले गवत, कडबा, पालापाचोळ्याचा १० सेंटिमीटर उंचीचा थर द्यावा. यामुळे जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी होते. उन्हाळ्याच्या सुरुवातीस झाडाच्या बुंध्याला एक मीटर उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट लावावी. यामुळे खोडाचे संरक्षण होते. पूर्ण ताण बसलेल्या झाडांची पाने चिंबतात, पिवळी पडून गळायला लागतात. ताणाच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजेच जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झाडांना खते द्यावीत. शिफारशीप्रमाणे ५० किलो शेणखत, नत्राची अर्धी मात्रा (६०० ग्रॅम नत्र), स्फुरद व पालाशची पूर्ण मात्रा (४०० ग्रॅम प्रत्येकी) द्यावी.

# उन्हाळ्यात केळी बागेत घ्यावयाची काळजी...

**उन्हाळी हंगाम हा केळी फळपिकाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. कारण केळी हे फळपीक अतिथंड हवामान व अति उष्ण हवामानास अत्यंत संवेदनशील असते. किमान व कमाल तापमान सहन करण्याची केळी फळपिकाची मर्यादा ही १० ते ३३ अंश सेल्सिअस इतकी आहे. केळी पीक कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत सहन करू शकते.**

उन्हाळी हंगामात तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असते. असे उच्च तापमान दीर्घकाळ राहिल्यास केळी पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम दिसून येतो. उष्णता, उष्ण वारे, जोराचे वारे, गारपीट आदी कारणांमुळे पाने फाटणे, घड सटकणे, झाडाचे खोड मध्यभागी मोडणे इत्यादी प्रकारे केळी पिकाचे नुकसान होते.



## उन्हाळ्यात होणारे नुकसान

» तापमान व सूर्यप्रकाश : तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक गेल्यास केळी पानांची प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते. तीव्र सूर्यप्रकाशामुळे पानांची पश्चिमेकडील कडा करपते. अधिक तापमान व तीव्र सूर्यप्रकाशामुळे बाष्पोर्जनाचा वेग वाढतो. तसेच बाष्पीभवनामुळे जमिनीतील ओलावा कमी होतो. त्यामुळे मुळांची पाणी व अन्नद्रव्ये शोषून घेण्याची क्रिया मंदावते. त्याचा सरळ परिणाम झाडाच्या वाढीवर व घडाच्या गुणवत्तेवर होतो. तीव्र उन्हामुळे निसवलेल्या घडातील वरील बाजूच्या फण्या करपून वाळून जातात. घडांचा दांडा काळा पडून कमकुवत होऊन घड सटकतात. तसेच घडातील फण्या देखील गळून पडतात. नवीन लागवड केलेल्या लहान रोपांच्या पानांची सुरळी तशीच राहून पाने उमलत नाहीत. पाने पांढरी दिसतात व ती करपतात. करपलेल्या ठिकाणी काळे डाग दिसतात.

» वारा : उन्हाळी हंगामात वाऱ्यांचा वेग जास्त असतो. उष्ण वाऱ्यांमुळे वातावरणात पसरलेली धूळ पानावर जाऊन बसते. वाऱ्यांमुळे पानांच्या घडातील फळांवर घर्षण होते. तसेच धुळीमुळे घडाची गुणवत्ता खालावते. वाऱ्यामुळे पाने फाटतात. त्यामुळे प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा येतो. वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे घड तयार होण्याच्या अवस्थेतील झाडाचे खोड मध्यभागी मोडते. वादळी वाऱ्यामुळे काही वेळा संपूर्ण झाड उन्मळून पडते. त्यात गारपीट झाली तर झाडांची पाने फाटतात किंवा संपूर्ण पाने मोडून पडते, घडावर व खोडावर जखमा होतात.



## वारारोधक कुंपण

केळी बाग व्यवस्थापनात वारा रोधक कुंपण अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. त्यासाठी केळी लागवड करताना बागेभोवती वारारोधक कुंपणाचे नियोजन करणे आवश्यक आहे. शेवरी हे उत्तम वारारोधक आहे. केळी बागेभोवती दोन ओळींत शेवरीची लागवड करावी. वारारोधकाचा फायदा केवळ उन्हाळ्यात नव्हे, तर हिवाळ्यात देखील होतो. वारारोधक कुंपणामुळे केळी बागेचे उन्हाळ्यात वाहणाऱ्या उष्ण लहरींपासून संरक्षण होते. केळीची पाने फाटणे, घड सटकणे व घडातील फळे गळून पडणे, झाड मध्यभागी मोडणे किंवा उन्मळून पडणे असे संभाव्य नुकसान टाळले जाते. वारारोधक कुंपण म्हणून हिरव्या शेडनेटचा वापर केला जातो. शेडनेटच्या कुंपणाची उंची केळी झाडांपेक्षा जास्त असावी ही काळजी घ्यावी.

## सिंचन व्यवस्थापन

उन्हाळी वाढलेले तापमान तीव्र सूर्यप्रकाश व वाऱ्यांचा वेग यामुळे झाडांची पाण्याची गरज वाढते. उन्हाळी हंगामात झाडातून बाष्पोत्सर्जनाचा वेग व जमिनीतून बाष्पीभवनाचा वेग वाढतो. त्यामुळे झाडांची पाण्याची गरज वाढते. त्यासाठी झाडाचे वय व तापमान यांचा अंदाज घेऊन सिंचन करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

## अन्नद्रव्य व्यवस्थापन

घड निसवण्याच्या तसेच घड पक्वतेच्या अवस्थेत असलेल्या मृग बागेस युरिया ५.५ किलो आणि म्युरेट ऑफ पोटॅश ७ किलो, तर मुख्य वाढीच्या अवस्थेतील कांदे बागेस युरिया १३ किलो आणि ८.५ किलो म्युरेट ऑफ पोटॅश प्रति एक हजार झाडे प्रति आठवडा या प्रमाणे फर्टिगेशनद्वारे द्यावे.

» घड व्यवस्थापन : उन्हाळ्यात मृग बागेतील केळी घड निसवण्याच्या तसेच घड पक्वतेच्या अवस्थेत असतात. केळी घड पूर्ण निसवल्यानंतर तसेच केळफूल तोडल्यानंतर पोटॅशिअम डायहायड्रोजन फॉस्फेट ५० ग्रॅम अधिक युरिया १०० ग्रॅम अधिक स्टीकर १० लिटर पाण्यात सोबत किंवा सल्फेट ऑफ पोटॅश (२ टक्के) २० ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळा घडावर फवारणी करावी. पहिली फवारणी केळफूल व शेवटची फणी कापल्यानंतर करावी. त्यानंतर १५ दिवसांनी दुसरी फवारणी करावी. घडांचे तीव्र सूर्यप्रकाश व धुळीपासून संरक्षण करण्यासाठी घड पॉलिप्रोपीलिन पिशव्यांनी झाकून द्यावेत.

» झाडांना आधार देणे : केळीचे खोड कमकुवत असते. जोराच्या वाऱ्यांमुळे खोड मोडून पडणे किंवा उन्मळून पडणे या समस्या बागेत दिसून येतात. यासाठी घड वाढीच्या अवस्थेत असलेल्या झाडांना पॉलिप्रोपॅलीन पट्ट्यांच्या साह्याने आधार द्यावा किंवा बांबू काठ्यांच्या साह्याने देखील आधार देता येतो.

» आच्छादनाचा वापर : केळी पिकाच्या दोन ओळींत ३० मायक्रॉन जाडीच्या चंदेरी काळ्या रंगाचे प्लॅस्टिक आच्छादन करावे. हे शक्य नसल्यास उसाचे पाचट, गहू, सोयाबीनचा भुस्सा अशा सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन करावे. आच्छादनामुळे बाष्पीभवनाच्या वेग कमी होऊन जमिनीतील पाणी टिकून राहते. तसेच जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवाणूंच्या संख्येत वाढ होते. घड सटकण्याचे तसेच झाडे उन्मळून पडण्याचे प्रमाण कमी होते.

» बाष्परोधकाचा वापर : केळी पानांतून होणाऱ्या बाष्पीभवनाचा वेग नियंत्रित करण्यासाठी, उन्हाळ्यात १५ दिवसांच्या अंतराने केओलीन (८ टक्के) ८० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. या फवारणीमुळे पानांवर पांढरा थर तयार होतो आणि तो पानातील छिद्रांना अंशतः बंद करतो.

# कोंबड्यांचे उन्हाळ्यातील व्यवस्थापन

**ऋतूमधील बदलानुसार हवामानात देखील बदल होतात, त्या अनुषंगाने हवामानाला अनुसरून कुक्कुटपालन व्यवस्थापनात बदल करावे लागतात. सर्वसाधारणपणे महाराष्ट्राचे हवामान उष्ण प्रकारचे आहे. त्यामुळे उन्हाळ्यात विशेषतः फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे आणि जून या चार-पाच महिन्याच्या कालावधीत कोंबड्यांच्या व्यवस्थापनाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. याचे आर्थिक कारण असे की होळीच्या सणानंतर संपूर्ण उन्हाळ्यात मांसल कोंबड्यांची चढ्या दराने विक्री होते. हा काळ नफा कमवण्याचा असला तरी उन्हाचा ताण सहन न करू शकल्याने अंडी व मांस उत्पादनात घट दिसून येते. व्यवसायातून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही.**

कोंबड्यांना आपल्यासारखे शरीराचे तापमान नियंत्रित करता येत नाही, कारण त्यांच्या शरीरामध्ये घामग्रंथी नसतात. इतर पाळीव प्राण्यांच्या तुलनेत कोंबड्यांचे सामान्य शरीर तापमान मूलतःच अधिक (१०३ ते १०७ डिग्री फॅरानाईट) असते. कोंबड्यांच्या योग्य वाढीसाठी १८ ते २१ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. परंतु ते २८ ते ३० अंश सेल्सिअस पर्यंतचे तापमान सहन करू शकतात. त्यांच्या उत्पादनात फारसा फरक पडत नाही. परंतु ३० अंश सेल्सिअसच्या वर तापमान गेल्यास त्याचा त्यांच्या उत्पादन आणि प्रजोत्पादनावर विपरीत परिणाम होतो. बाह्य तापमान ३५ अंश सेल्सिअसच्यावर गेल्यास प्रति अंश तापमान वाढीने ५ टक्के उत्पादन घट होते. कोंबड्या उन्हाळ्यात शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी तोंडावाटे शरीरातील उष्णता बाहेर टाकतात यालाच धापणे (पॅंटिंग) म्हणतात. याचा विपरीत परिणाम वाढीवर, रोगप्रतिकार क्षमतेवर आणि उत्पादनावर होतो. योग्य व्यवस्थापन न केल्यास मांसल कोंबड्यांचे वजन ४२ दिवस वय होऊनही वाढत नाही. मोठ्या कोंबड्यांमध्ये मरतुकीचे प्रमाण अधिक होते. हे संभावित नुकसान टाळण्यासाठी व कोंबड्यांची अक्षम शरीर तापमान नियंत्रण प्रणाली विचारात घेता विशेष लक्ष देऊन काळजी घेणे गरजेचे ठरते.

## कोंबड्यामध्ये दिसणारी उष्माघाताची लक्षणे

» कोंबडी श्वास तोंडावाटे घेतात. पाणी जास्त पितात. भूक मंदावते.
» तोंडाची उघडझाप करून धापा टाकतात. पोट जमिनीला घासतात.
» डोळे बंद करतात. हालचाल मंदावते. सुस्त राहतात.
» अंडी उत्पादनात घट होते. अंड्याचे वजन कमी होते.
» अंड्याच्या बाहेरील कवचाची गुणवत्ता कमी होते. शारीरिक वजनात लक्षणीय घट होते.
» मांसल कोंबड्यांचे वजन कमी होते. प्रजोत्पादन यावर उष्णतेचा विपरीत परिणाम होतो.
» रोगप्रतिकार शक्ती कमी होते त्यामुळे च्या आजारास बळी पडतात.
» खाद्याचे मांस किंवा अंड्यामध्ये रूपांतर क्षमता कमी होते.
» काही कोंबड्या भिंतीच्या आडोशाला पडून राहतात. पाण्याच्या भांड्याजवळ थंड जागेत मान वाकवून बसतात
» शरीराचे तापमान कमी करण्यासाठी व शरीरात थंडपणा आणण्यासाठी कोंबड्या पंख शरीरापासून दूर पसरवितात.
» त्वचा रखरखीत होते. रंगामध्ये बदल दिसून येतो.
» दीड किलो पेक्षा अधिक वजनाच्या कोंबड्यांना दुपार ते संध्याकाळच्या वेळी ताप येतो, लालसर होऊन मरण पावतात.



## अशा करा उपाययोजना...

» शेड बांधताना घराची लांबी पूर्व-पश्चिम ठेवावी. वायुवीजन व्यवस्था सक्षम असावी.
» उन्हाळ्यात गादीसाठी लाकूड भुश्याऐवजी तांदळाचा तूस किंवा भुईमूग टरफलांचा वापर करावा.
» गादी पद्धतीत वापरात येणाऱ्या तुसाची जाडी कमी (१ ते १.५ इंच) करावी.
» शेडमध्ये संख्या किमान १० टक्क्यांनी कमी करावी.
» कोंबड्यांना थंड, स्वच्छ, ताजे पिण्यायोग्य पाणी मुबलक प्रमाणात पुरवावे.
» पिण्याच्या पाण्याची भांडी संख्या दुपटीपर्यंत वाढवावी.
» क्लोरीनयुक्त पाण्याचा वापर करावा. यामुळे पाण्यातून होणारे आजार टाळता येतील.
» पिण्याच्या पाण्यामधून जीवनसत्त्व (क व ई), सेलेनीअम आणि इलेक्ट्रोलाइट यांचा वापर करावा. त्यामुळे उष्णतेचा ताण कमी होईल.
» पिण्याचे पाणी पुरवणारी टाकी शेडमध्ये विशिष्ट उंचीवर बसवावी अथवा बाहेरच्या बाजूस बसवली असेल तर त्यास बारदानाची पोती गुंडाळून त्यावरती थंड पाणी टाकावे जेणेकरून आतील पाणी थंड राहण्यास मदत होईल.
» टाकीतून भांड्यांपर्यंत जाणारी पाइपलाइन देखील शेडच्या आतमधूनच असावी, जेणेकरून भांड्यात पोहोचणारे पाणी थंड राहते.
» शेडमधील कामे सकाळीच उरकून घ्यावीत. दुपारच्या वेळेत कोणतीही कामे करू नयेत. जेणेकरून त्याचा ताण कोंबडीवर पडणार नाही.
» लसीकरण सकाळी ८ च्या अगोदर अथवा संध्याकाळी ७ नंतर करावे.
» खाद्य देण्याचे एक वेळापत्रक ठरवून घ्यावे. त्याचे काटेकोरपणे पालन करावे.



» कोंबडीचे वजन १.५ किलो च्या आसपास झाल्यावर त्यांना दुपारच्या (११ ते ५) वेळेत खाद्य देऊ नये. त्याकरिता खाद्य भांडी वरती करून ठेवावीत.
» खाद्य दिल्यानंतर साधारणतः अर्धा ते दीड तासात कोंबड्यांच्या शरीर तापमानात वाढ होते. यामुळे त्यांच्यावरील उष्णतेचा ताण वाढतो, म्हणून दुपारचे खाद्य देणे टाळावे.
» मांसल कोंबडी खाद्यात मुख्य ऊर्जा स्रोत म्हणून वनस्पती तेलाचा ४ ते ५ टक्के या प्रमाणात वापर करावा.
» अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्यात खाण्याचा सोडा वापरावा.
» अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्य भांड्यात टाकलेल्या खाद्य पृष्ठभाग यावरती शिंपले अथवा मार्बलचे तुकडे थोड्या प्रमाणात पसरावेत.
» शेडमधील बल्ब किंवा ट्यूबलाइट्स रात्रीच्या १ ते २ तासापर्यंत लावून कोंबड्यांना थंड वातावरणात खाद्य खाण्यास प्रोत्साहित करावे.
» शेडच्या सभोवताली उंच व सरळ जाणारी झाडे (उदा. अशोका) लावावीत.
» स्प्रिंकलर्स छतावर आणि फॉगर्स शेडमध्ये बसवावेत. स्प्रिंकलर्स आणि फॉगर्स यांचा वापर हा सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच्या दरम्यान दर १ ते २ तासांनी करावा.
» बाजूभिंतीच्या जाळीवर बारदान पोती लावावीत व त्यावर स्प्रिंकलर्सचे पाणी पडेल याची सोय करावी.
» शेडनेटचा वापर देखील करता येतो.
» शेडमध्ये कुलर किंवा पंखा याचा वापर करणेही योग्य राहते, परंतु कुलर मध्ये संपूर्ण दुपारभर पाणी आहे हे वेळोवेळी निश्चित करावे. तसेच कुलरमुळे निर्माण होणारी अधिकच्या आर्द्रतेचे वायुवीजन योग्य रीतीने होईल हे निश्चित करावे.
» शेडच्या छतावर वेलवर्गीय वनस्पती जसे की, दोडके, कारले वेलीचे आच्छादन फायद्याचे ठरू शकते.
» छतावर सूर्यप्रकाश परावर्तीत करणाऱ्या पत्र्यांचा वापर करावा जेणेकरून शेडच्या आतील तापमान कमी राखण्यास अधिक मदत होते.

# कडक उन्हात पपई बागेत करायचे उपाय...

**पपई पिकाला सरासरी २२ ते २६ अंश सेल्सिअस तापमान मानवत. पण उन्हाळ्यात तापमानाचा पारा ४० च्या वर जातो. त्यामुळे पपईची पानं करपण, फळावर चट्टे पडणं, फळातील गर खराब होऊन फळे पिवळी पडून गळतात. पपई झाडाची मुळे मांसल असल्यामुळे जमिनीतील तापमानामुळे उष्णतेचा परिणाम मुळांवर होतो. त्यामुळे मुळे खराब होतात. मुळांच अन्नद्रव्य आणि पाणी शोषण करण्याचे कार्य मंदावत. फळांचा आकार लहान राहतो आणि फळाच्या गरामध्ये साका तयार होतो. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होते.**

## उपाय काय करायचे...?



बागेला ठिबक सिंचनाद्वारे शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. झाडाच्या खोडाच्या चारही बाजूंनी उसाचे पाचट, वाळलेले गवत, गव्हाचा भुस्सा, पालापाचोळा, लाकडी भुस्सा यांचे आच्छादन करावे. आच्छादनाचा थर साधारण ३ ते ४ इंच इतका खोडाच्या चारही बाजूंनी करावा. बागेत ६० ते १०० मायक्रॉन जाडीचे काळ्या रंगाचे प्लास्टिक आच्छादन करावे. झाडावर ५ ते ८ टक्के तीव्रतेच्या बाष्परोधकाची १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. बागेभोवती वारा प्रतिबंधक कुंपण केल्यासही बागेच उन्हापासून संरक्षण होतं. नवीन लागवड केलेल्या झाडांना गोणपाट किंवा जुन्या साड्या लावून सावली करावी. सायंकाळच्या वेळी संपूर्ण झाडावर एक दिवसाआड पाण्याचा फवारा पंपाने करावे. पिकाची पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविण्यासाठी पानांवर १ ते १.५ टक्के पोटॅशिअम नायट्रेट द्रावणाची फवारणी करावी. अशा प्रकारचे साधे उपाय करुन पपई बाग कडक उन्हापासून वाचवता येते.

# घरातून पळून गेलेल्या पाच मुलांची ‘आरपीएफ’कडून वाशीम रेल्वे स्थानकावर सुटका




**वाशिम (प्रतिनिधी)** – दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे संरक्षण दलाने प्रवासी सुरक्षा आणि सार्वजनिक सेवेसाठी आपली सतर्कता व समर्पण पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. विविध रेल्वे स्थानकांवर करण्यात आलेल्या यशस्वी कारवायांमधून ही बाब अधोरेखित झाली आहे.

ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत वाशीम रेल्वे स्थानकावर घरातून पळून आलेल्या पाच अल्पवयीन मुलांची रेल्वे सुरक्षा बलने सुटका केली. रेल्वे सुरक्षा बल चे हेड कॉन्स्टेबल एस. एम. बालखंडे यांनी रेल्वेमध्ये फिरताना ही मुले घाबरलेल्या अवस्थेत आढळली. तात्काळ कारवाई करत ठझऋ ने चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) ला माहिती दिली व त्यांच्या पालकांचा शोध घेतला. जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी समुपदेशन व पडताळणी केल्यानंतर या मुलांना पुढील काळजी व पुनर्वसनासाठी चाईल्ड हेल्पलाईनकडे सुरक्षितपणे सुपूर्द करण्यात आले.

ऑपरेशन अमानत अंतर्गतही कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणा आणि कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण दाखवले. नांदेड रेल्वे स्थानकावर हेड कॉन्स्टेबल एस. श्रीधर यांनी ट्रेन क्रमांक ११००१ एक्सप्रेसमध्ये एका प्रवाशाने विसरलेले टायटन कंपनीचे स्टीलचे मनगटी घड्याळ शोधून काढले. सुमारे छ८,००० किंमतीचे हे घड्याळ योग्य पडताळणीनंतर मालकाला परत करण्यात आले. त्याचप्रमाणे जालना रेल्वे स्थानकावर कॉन्स्टेबल संदीप जाधव यांनी एक बेवारस बॅग शोधून काढली. त्या बॅगमध्ये सॅमसंग मोबाईल फोन आणि औषधे होती. योग्य पडताळणीनंतर ती बॅग संबंधित प्रवाशाला परत देण्यात आली.

प्रवासी सुरक्षेला अधिक बळकटी देत ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत ठझऋ आणि सरकारी रेल्वे पोलिसांच्या संयुक्त पथकाने पूर्णा जंक्शन येथे एका सराईत गुन्हेगाराला अटक केली. हा आरोपी चोरी करण्याच्या प्रयत्नात असताना पकडण्यात आला. पुढील तपासात त्याचा संबंध ट्रेन क्रमांक १८५०४ एक्सप्रेसमधील एका प्रवाशाच्या सुमारे छ२ लाख किमतीच्या वस्तू चोरी प्रकरणाशी असल्याचे निष्पन्न झाले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपीला लोहमार्ग पोलीसकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

या सर्व कारवायांमधून रेल्वे सुरक्षा बल कर्मचाऱ्यांची सतर्कता, प्रामाणिकता आणि मानवतावादी दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करणे, हरवलेल्या वस्तू शोधून परत देणे, तसेच असुरक्षित मुलांची सुटका करणे यामध्ये ठझऋ सातत्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या कारवायांमध्ये सहभागी ठझऋ कर्मचाऱ्यांचे रेल्वे प्रशासनाने कौतुक केले आहे.

## विमानतळ परिसरातील नागरी सुविधांबाबत बैठक घेणार – मंत्री डॉ. सामंत

**मुंबई (प्रतिनिधी)** – नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील नागरी सुविधाबाबत बैठक घेण्यात येईल अशी माहिती मंत्री डॉ.उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सचिन अहिर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

मंत्री डॉ.उदय सामंत म्हणाले, मुंबईतील देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानतळांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी करण्यात आली आहे. विमानतळाशी जोडणी अधिक मजबूत करण्यासाठी मेट्रो आणि रस्ते प्रकल्पांवर भर दिला जात आहे. या विमानतळ परिसरातील नागरी सुविधांचा विकास टप्प्याटप्प्याने सुरू असून प्रवाशांना अधिक सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. ज्या ठिकाणी काही उणीवा आहेत, त्या दूर करण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढवून आवश्यक निर्णय घेतले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# मुंबईकर उकाड्याने हैराण होणार तर मराठवाड्यावर अवकाळी पावसाचं सावट





**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात काही दिवसांपासून अवकाळी पावसाचे ढग होते. मराठवाडा, विदर्भासह मध्य महाराष्ट्रात बऱ्याच भागात गारांचा पाऊस झाला. अनेक भागात मुसळधार पावसाचे अंदाज होते. आता मात्र प्रचंड उन्हाच्या झळा बसू लागल्या आहेत. कमाल तापमानाचा पारा पुन्हा एकदा ४० च्या घरात जाताना दिसत आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील पाच दिवस राज्यभरात प्रचंड उकाडा आणि उन्हाचा कडाका जाणवणार आहे. तर मराठवाड्यात व मध्य महाराष्ट्रात काही भागात मुसळधार पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत.

भारतीय हवामान विभागाने दोन दिवस मुंबई आणि आसपासच्या परिसरासाठी उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा दिला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरीला आज यलो अलर्ट जारी केला आहे. तर मराठवाडा विदर्भात काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे किनारपट्टीच्या भागात उष्णतेच्या लाटा आणि मराठवाडा विदर्भात अवकाळी पावसाचा इशारा आहे.

२३ मार्च– मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी– उष्णतेचा येलो अलर्ट

सांगली, सातारा, सोलापूर, धाराशिव ,लातूर वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा यलो अलर्ट. २४ मार्च– मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यात उष्ण व दमट हवामानाचा येलो अलर्ट

सोलापूर धाराशिव लातूर नांदेड जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट, सातारा सांगली पुणे हिंगोली या जिल्ह्यांना तुरळक पावसाची शक्यता. २५ मार्च: सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, मुसळधार पावसाचा यलो अलर्ट मध्य महाराष्ट्रात व मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता. २६ मार्च– यवतमाळ चंद्रपूर गडचिरोली वादळी वाऱ्यासह पावसाचा यलो अलर्ट. आज वाशिम, अकोला, अमरावती, सांगली, सोलापूर, ठाणे या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. या जिल्ह्यांमध्ये ३६ ते ३७ अंश सेल्सिअस तापमान होते. उर्वरित भागात ३५ ते ३६ अंश सेल्सिअस तापमानापर्यंत पारा पोहोचला होता.

# राज्यपालांच्या उपस्थितीत महाराष्ट्र लोक भवन येथे बिहार राज्य स्थापना दिवस साजरा

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे ’बिहार राज्य स्थापना दिवस’ साजरा करण्यात आला. ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र लोकभवनातर्फे बिहार राज्य स्थापना दिनाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला.

बिहार ही संस्कृती, अध्यात्म व तत्वज्ञानाची भूमी आहे. या भूमीने देशाला भगवान महावीर व भगवान बुद्ध दिले. भारत आज जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. परंतु त्याहीपेक्षा भारत लोकशाहीची जननी आहे व या लोकशाहीची पाळेमुळे बिहारमधील बुद्ध संघाच्या कार्यप्रणालीमध्ये आहे व त्यामुळे बिहार ही संसदीय परंपरांची जन्मभूमी आहे, असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केले.


बिहार येथील लोक महाराष्ट्रासह देशाच्या विभिन्न राज्यांमध्ये योगदान देत आहेत. मूळचे बिहार येथील अधिकारी आज अनेक राज्यात भारतीय प्रशासकीय सेवा व भारतीय पोलीस सेवेच्या माध्यमातून योगदान देत आहेत. बिहारी लोक देशाच्या सर्व भागात आहेत. त्रिपुरासह देशाच्या उत्तर पूर्व राज्यात देखील बिहारी जनता वसली असून तेथेही ‘छट पूजा’ साजरी केली जाते, आज बिहार समृद्ध इतिहासाची भविष्यातील विकासाची सांगड घालत आहे.

भारत हा केवळ सीमा, सैन्य व परराष्ट्र धोरण असलेला देश नसून भारत हे संस्कृती व ज्ञान परंपरा असलेले राष्ट्र आहे. देशातील राज्याराज्यांमध्ये विविधता असली तरीही देशात एकात्मतेचा विचार सखोल रुजला आहे असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी बिहारचे लोकनृत्य व भोजपुरी गीत यांचा समावेश असलेला सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला. या सादरीकरणाबद्दल विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूचे अभिनंदन करताना बिहारच्या गीत, नृत्य व संगीतात जोश आहे, असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी बिहारचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल (से.नि.) सय्यद अता हसनैन यांचा संदेश व्हिडिओच्या माध्यमातून दाखविण्यात आला. बिहार राज्याची समग्र माहिती देणारी चित्रफीत देखील यावेळी दाखवण्यात आली.

या सांस्कृतिक कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मिथिला प्रदेशाचे लोकनृत्य झिझिया व जट-जटिन सादर केले तसेच एक भोजपुरी गीत देखील सादर केले. राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे यांनी प्रास्ताविक केले तर शिक्षण शाखेतील कक्ष अधिकारी वंदना मोरमारे यांनी आभार प्रदर्शन केले.

# तुषार दोशींच्या निलंबनाचा अधिकार उपसभापतींना आहे का?

## नीलम गोऱ्हेंना पदावरून हटवा, ठाकरेंच्या सेनेची मागणी



**मुंबई (प्रतिनिधी)** – सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरून विधिमंडळात राडा झाल्यानंतर आता त्याच्या पुढचा अंक सुरू झाल्याचं चित्र आहे. एखाद्या आयपीएस अधिकाऱ्याच्या निलंबनाचे अधिकार विधान परिषदेच्या उपसभापतींना असतो का असा प्रश्न ठाकरेंच्या शिवसेनेने विचारला आहे. तसेच नीलम गोऱ्हे (छशशश्ररा ञ्रेहश) यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केला असून त्यांना पदावरून दूर करा अशी मागणी करणारं पत्र ठाकरेंच्या शिवसेनेने सभापतींना दिलं आहे. या संदर्भात ठाकरेंच्या शिवसेनेकडून मंगळवारी विधान परिषदेत प्रस्ताव मांडला जाणार आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये राज्याचे मंत्री शंभुराज देसाई आणि मकरंद पाटील यांच्याशी पोलिसांनी झटापट केली. त्यामध्ये शंभुराज देसाई यांच्या हाताला जखम झाली. या घटनेचे पडसाद विधान परिषदेत उमटलं. या प्रकरणात उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी साताऱ्याचे एसपी तुषार दोशी (खझड ढीहरी ऊेहळ) यांच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणावरून राज्य सरकारवर टीकेचा आसूड ओढणाऱ्या ठाकरेंच्या सेनेकडून आता नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात प्रस्ताव मांडणार आहेत. नीलम गोऱ्हे यांना आयपीएस अधिकाऱ्याच्या निलंबनाचे अधिकार आहेत का? असा प्रश्न ठाकरेंच्या सेनेने विचारला.

### टी.सी. हरवली

माझी पद्मा अप्पाराव मादास या नावाची अकरावी मध्ये शिकत असलेली टी.सी. पुणे ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. पद्मा अप्पाराव मादास**
**मु.पो. धनेगाव ता.जि. नांदेड**
**मो.नं. ७७९८५८८२०५**

### जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे पती कै. प्रकाश शिवाजीराव डिकंटवार यांच्या मालकीचा व माझ्या कब्जात असलेला मनपा नांदेड ता.जि. नांदेड हद्दीतील मौजे जयप्रकाश नगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. फत्तेजंगपूर ता.जि.नांदेड गट क्र. १४२ पैकी प्लॉट क्र. ७५अ ज्याची चतुःसिमा पुढील प्रमाणे.

पूर्वेस : ६ मीटर अंतर्गत रस्ता
पश्चिमेस : श्रीधर हंबर्डे
दक्षिणेस : प्लॉट क्र. ७५चा भाग
उत्तरेस : धनवडे साहेब

वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट माझ्या पतीने कायमस्वरूपी खरेदी करून त्यांच्या नावाची नोंद संबंधित संस्थेमध्ये करून ताबा पत्रक घेतले होते. सदर ताबा पत्रक जयप्रकाश नगरचे जुना मोंढा प्रवासात गहाळ झाले आहे. भविष्यात मूळ ताबा पत्रक सापडल्यास मी त्याचा गैरवापर करणार नाही व आपल्या कार्यालयात जमा करीन तरी साहेबांनी मला पुढील कामाकरीता सदर मूळ ताबा पत्रकाची द्वितीय प्रत देण्यात यावी. ही नम्र विनंती.

करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर– प्रगटन देणार**
**शकुंतला भ्र. प्रकाशराव डिकंटवार**
**रा. जयप्रकाश नगर, असर्जन, नांदेड**

### महाराष्ट्र शासन
**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर**
**कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड**
पत्ता: **चैतन्यनगर, नांदेड-४३१६०५**
ई-मेल : **eenidnnd@rediffmail.com**
**ई निविदा सूचना क्र. ०४ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामा करिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.inयेथून डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची अंदाजित किंमत (वस्तू व सेवा कर वगळून) रु.लक्ष |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | निम्न मानार धरणाच्या टो ड्रेनचे पुनर्बांधणी व मोजमाप उपकरण बसवणेचे काम करणे ता.कंधार जि. नांदेड | नांदेड | १५१.४० |
| २ | निम्न मानार धरणाच्या खालच्या (डाउनस्ट्रीम) उतारावर संरक्षणात्मक कामे करणे ता.कंधार जि. नांदेड | नांदेड | ६४.६६ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २४/०३/२०२६ ते दिनांक ०१/०४/२०२६
ई-निविदा उघडण्याचा दिनांक : ०२/०४/२०२६ (शक्य असल्यास)

जा.क्र. नांपावि(द.)नां/लेखा-४/ ६३५/२०२६ दिनांक :२०/०३/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
नांदेड पाटबंधारे विभाग (द.) नांदेड

(आ.शि.चौगले)
कार्यकारी अभियंता
नांदेड पाटबंधारे विभाग (द.) नांदेड


### Change In Name

My Old Name is **FATEMA SADAF MD. NAZIRUDDIN** which now I am changing as New Name **FATEMA SADAF MOHAMMED NAZEERUDDIN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - Fatema Sadaf Mohammed Nazeeruddin Plot No. 58, Ekta Nagar, Cannal Road, Taroda (Bk.) Nanded 431605 Mo.No. 9923472555**

### Change In Name

My Old Name is **AFREEN KHANAM NOOR KHAN PATHAN** which now I am changing as New Name **AFREEN BEGUM SHAIKH ASLAM.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - H.No. 1-13-22, Hingoli Gate, Ashraf Nagar, Nanded**

### Change In Name

My Old Name is **SABER SHAIKH ANWAR** which now I am changing as New Name **SABER SHAIKH ANWAR SHAIKH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - S/o. Anwar Shaikh H.No. 2-5-407/2, Khadakpura, Waghi Road, Near Sara Masjid Barkatpura, Nanded 431601 Mo.No. 8888523216**

### Change In Name

My Old Name is **ZARA SULTANA** which now I am changing as New Name **ZARA SULTANA SHAIKH ZAKIR.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - D/o. Shaikh Zakir Shaikh Anwar H.No. 2-5-407/2, Anwar Manzil, Barkatpura, Nanded Waghi Road, Near Abrar Function Hall, Nanded 431602 Mo.No. 9657419857**

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



### Change In Name

My Old Name is **ZAKIR SHAIKH ANWAR** which now I am changing as New Name **SHAIKH ZAKIR SHAIKH ANWAR.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - S/o. Shaikh Anwar H.No. 2-5-407/2, Anwar Manzil, Barkatpura, Nanded Waghi Road, Near Abrar Function Hall, Nanded 431602 Mo.No. 9657419857**


### पाहिजेत

पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन खालील रिक्त पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पद | विषय | अर्हता | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षण सेवक इ.9-10 वी | विज्ञान | B.Sc., B.Ed. | 1 |
| 2 | शिक्षण सेवक इ.6-8 वी | गणित | B.Sc., B.Ed., TET/CTET | 1 |
| 3 | शिक्षण सेवक इ.6-8 वी | इंग्रजी | B.A., B.Ed. TET/CTET | 1 |
| 4 | शिक्षण सेवक इ.6-8 वी | सामाजिक शास्त्र | B.A., B.Ed. TET/CTET | 1 |
| 5 | शिक्षण सेवक इ.5 वी | सर्व विषय | B.A./H.S.C, D.Ed., TET/CTET | 1 |

**अटी व शर्ती:** 1) संबंधित विषयाची अर्हता शासनमान्य विद्यापीठाची असावी. 2) माध्यमिक पदांची नियुक्ती मा .शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिनांदेड यांच्या मान्यतेच्या अधीन राहील3 .प.) नियुक्ती प्रक्रिया शासन नियमांनुसार करण्यात येईल. 4) अपूर्ण किंवा उशिरा आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. 5) निवडीचा अंतिम अधिकार शाळा समितीकडे राहील.

इच्छुक उमेदवारांनी अर्ज, बायोडाटा, फोटो व प्रमाणपत्रांच्या प्रतींसह दि. 06/04/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावा पात्र उमेदवारांना .मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाण ई मेल व-वहॉट्सॲपद्वारे कळविण्यात येईल.

मदिनातुल उलूम माध्यमिक शाळा,इनामदार गल्ली,भोकर
(उर्दू माध्यम – अल्पसंख्यांक व 100% अनुदानित)

मुख्याध्यापक
मदिनातुल–उलूम माध्यमिक शाळा
भोकर जि. नांदेड

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# खा. अशोकराव चव्हाण यांची महाराष्ट्रातील लहान शहरांसाठी इलेक्ट्रिक बसेसची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण यांनी सोमवारी संसदेत महाराष्ट्रातील टियर-२ व टियर-३ शहरांसाठी 'पीएम ई-बस सेवा' योजनेअंतर्गत इलेक्ट्रिक बसेसची मागणी केली. या योजनेच्या पुढील टप्प्यात ३ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या जास्तीत जास्त शहरांना बसेस उपलब्ध करून देण्याचा केंद्र सरकारचा मनोदय असल्याचे केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी उत्तरादरम्यान स्पष्ट केले.





राज्यसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात 'पीएम ई-बस सेवा' योजनेबाबत सोमवारी झालेल्या चर्चेत सहभागी होताना खा. अशोकराव चव्हाण यांनी या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात ३५ हजार इलेक्ट्रिक बसेसचे वितरण करण्याच्या केंद्र सरकारच्या घोषणेचे स्वागत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या योजनेमुळे नागरिकांना माफक दरात पर्यावरणपुरक प्रवास करता येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले की, मोठ्या महानगरपालिकांकडे आर्थिक स्रोत मुबलक असल्याने त्यांना शहर बससेवा प्रभावीपणे राबवणे शक्य होते. मात्र, लहान महानगरपालिकांचे आर्थिक स्रोत मर्यादित असल्यामुळे त्यांना ही सेवा सुरू करण्यात अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर ३५ हजार इलेक्ट्रिक बसांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट असलेल्या 'पीएम ई-बस सेवा' योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील टियर-२ व टियर-३ शहरांना अधिकाधिक बस देण्यासाठी स्वतंत्र विचार केला जाणार आहे का, असा प्रश्न खा. अशोकराव चव्हाण यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर म्हणाले की, या योजनेत जास्तीत जास्त शहरांचा समावेश करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. मात्र, दुसऱ्या टप्प्याचे निकष अद्याप निश्चित झालेले नाहीत. अंतिम निकष ठरल्यानंतर राज्य सरकारांनी आपले प्रस्ताव व सूचना पाठवाव्यात. त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत त्यांनी अनुकूलता व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १६ ऑगस्ट २०२३ रोजी पीएम ई-बस सेवेचा प्रारंभ केला होता. पहिल्या टप्प्यात २०२७ अखेरपर्यंत देशभरातील ११६ शहरांमध्ये १० हजार बसेसचे वितरण होणार असून, त्यानंतर ३५ हजार बसेसच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरु होईल, अशीही माहिती केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी यावेळी दिली.

# रामतीर्थ येथील दुसऱ्या समाधान शिबिराचाही तहसीलदारांना पडला विसर

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – रामतीर्थ (ता. बिलोली) येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिराचा मोठा फज्जा उडाल्यानंतर आता दुसऱ्यांदा शिबीर घेण्याचे दिलेले आश्वासनही हवेतच विरल्याचे चित्र दिसत आहे.

शनिवार, दि. १४ मार्च रोजी आयोजित शिबिरासाठी नेमण्यात आलेल्या २६ अधिकाऱ्यांपैकी निम्म्याहून अधिक अधिकारी गैरहजर राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त झाली होती. या प्रकारानंतर बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे यांनी गैरहजर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे तसेच २१ मार्च रोजी पुन्हा शिबीर घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजतागायत ना कारवाई झाली, ना दुसरे शिबीर आयोजित झाले. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रामतीर्थ येथील जवाहर नवोदय विद्यालयात सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत शिबीर आयोजित करण्यात आले होते. मात्र शिबीर सुरू होताच अनेक विभागांचे अधिकारी अनुपस्थित असल्याचे समोर आले. किनाळा येथील सरपंच विठ्ठल माने यांनी सर्व २६ विभागांच्या अधिकाऱ्यांची हजेरी तपासण्याची मागणी केली. त्यानुसार घेतलेल्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणात अधिकारी गैरहजर असल्याचे स्पष्ट झाले.

यावेळी विविध गावांमधून आलेल्या नागरिकांनी आपले प्रश्न मांडले. मात्र एकाही समस्येचे समाधान जागेवर झाले नाही. यामुळे शासन आपल्या दारी ही संकल्पना कागदावरच राहिल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

किनाळा येथील सरपंच विठ्ठल माने यांनी प्रशासनाला थेट इशारा देत म्हटले, महापुरुषांच्या नावाने शिबीर घेऊनही जनतेचे प्रश्न सुटत नसतील, तर असे शिबीर बंदच करावेत. महसूल विभागातील मंडळ अधिकारी कल्पना मुंडकर, तलाठी विजय पाटील-जाधव व प्रणिता काळे यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

# आसना पुलाजवळ स्कूल बस उलटली





**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या सांगवी आसना नदी पॉईंटजवळ भरधाव वेगातील पिनॅकल शाळेची स्कूल बस २३ मार्च रोजी उलटली. त्यात विद्यार्थी नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

पिनॅकल शाळेची स्कूल बस पिंपळगाव (महादेव) येथे विद्यार्थ्यांना सोडून सोमवार, दि. २३ मार्च रोजी परत जात होती. भरधाव वेगात असल्यामुळे ही बस आसना नदीच्या पुलाजवळ उलटली. यामुळे आजूबाजूला असलेल्या लोकांनी बसकडे मदतीसाठी धाव घेतली. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांनीही घटनास्थळी जाऊन पाहणी केली. पिंपळगाव येथे विद्यार्थ्यांना सोडून ही बस परत येत होती. यामुळे मोठी दुर्घटना टळली.

याप्रकरणी चालक चंदू बाबुराव हाळे (रा. हाळ्याची वाडी) याला ताब्यात घेतले आहे. शहरातून आणि शहराबाहेरील शाळांसाठी असलेल्या स्कूल बस भरधाव वेगात चालविल्या जात आहेत.

# सिडकोत ईद उत्साहात

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –सिडको, हडकोतील लोकांनी मुजापेट ईदगाह मैदानावर सकाळी साडे आठ वाजता नमाज अदा केली.

ईद उल फित्र रमजान महिना ईस्लाम धर्माचा सर्वात मोठा सण आहे. पूर्ण महिना रोजे धरल्यानंतर मुस्लीम बांधव ईद साजरी करतात. नमाज अदा केल्यानंतर मौलवी यांनी संपूर्ण देशात हिंदू-मुस्लीम एकता, बंधूभाव नांदावा, बळीराजा सुखी व्हावा म्हणून प्रार्थना करण्यात आली.

सिडको येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शेख मोईन लाठकर यांच्या निवासस्थानी रमजान ईदनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार बांधव, आजी-माजी नगरसेवक आणि नगरसेवकांचे प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते डॉ.अशोक कलंत्री, विद्यानिकेतनच्या मुख्याध्यापिका विनया बेताळे, सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब पाटील, नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे, साडेगावकर, हुम्बाड पाटील, उमाकांत स्वामी, मासूम खान, शेख कलीम, अब्दुल रहेमान, संतोष कराळे, नितीन वाघमारे, माजी नगरसेविका बेबीताई गुपीले, रईस खान यांच्यासह पदाधिकारी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस अधीक्षक कार्यालयात शहीद दिनानिमित्त अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात सोमवार, दि. २३ मार्च रोजी शहीद दिनानिमित्त क्रांतिकारकांना अभिवादन करण्यात आले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली नियंत्रण कक्षाचे पोलीस उपनिरीक्षक भगवान मोरे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी जळबा गायकवाड यांच्यासह पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन शहिदांना अभिवादन केले.

# शहरात २ खंजर जप्त; तिघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील आनंदनगर चौक व देगलूर नाका येथे पोलिसांनी २१ मार्च रोजी ३ तरुणांकडून २ खंजर जप्त केले. याप्रकरणी विमानतळ व इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

स्ट्रीट सेफ्टी पथक व शहरातील सर्व पोलीस ठाण्यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिले आहेत. त्यानुसार २१ मार्च रोजी पोलिसांनी आनंदनगर चौकातून लेबर कॉलनी येथील रहिवासी आरोपी शेख सोएब शेख सादिक, नवी आबादीतील शेख अरबाज यांना विनापरवाना बेकायदेशीर खंजर जवळ ठेवल्यामुळे कारवाई केली. यावेळी खंजर जप्त करून त्यांच्या विरोधात विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे.

दुसऱ्या घटनेत देगलूर नाका भागात महेबूबनगर येथील रहिवासी आरोपी शेख सोएब शेख रहीम हा विनापरवाना बेकायदेशीर खंजर बाळगून होता. त्याची अंगझडती घेऊन तो खंजर पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

# नलिनी उमरीकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –उमरीकर परिवारातील ज्येष्ठ सदस्य श्रीमती नलिनी भानुदासराव उमरीकर यांचे अल्पशा आजाराने सोमवार, दि. २३ मार्च रोजी दुपारी ३.४५ वाजता निधन झाले. त्या ८२ वर्षांच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार, दिनांक २४ मार्च रोजी सकाळी ९ वाजता राहते घर धनुष्यबाण कमानी जवळ सिडको येथून निघणार आहे. सिडको वैकुंठधाम स्मशानभूमी येथे त्यांचा अंत्यविधी होणार आहे. त्यांच्या पश्चात मुले उदय, प्रकाश, मुली सौ. उमा, सौ. ज्योती, सौ. स्वाती, श्रीमती वैशाली, सुना, जावई, नातू, पणती, पुतणे, भावजाई असा परिवार आहे. पत्रकार कृष्णा उमरीकर यांच्या त्या काकू होत.

# महापालिकेत शहीद दिनानिमित्त अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महापालिकेतर्फे दि.२३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या स्थायी सभागृहात शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांच्या प्रतिमेस कविता संतोष मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सुध्दा प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. भारतात दरवर्षी २३ मार्च हा दिवस 'शहीद दिन' म्हणून साजरा केला जातो. आजच्या दिवशी, म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील तीन महान क्रांतिकारक भगतसिंग, शिवराम हरी राजगुरू आणि सुखदेव थापर यांना ब्रिटिश सरकारने लाहोरच्या तुरुंगात फाशी दिली होती. त्यांच्या या सर्वोच्च बलिदानाची आठवण म्हणून संपूर्ण देश त्यांना आदरांजली वाहतो. हा दिवस तरुण पिढीला देशभक्ती, त्याग आणि धैर्याची प्रेरणा देतो. याप्रसंगी नगरसेवक आशिष नेरलकर, सुमित मुथा, नगरसेविका कविता गड्डम, सरिता बिरकले, निरंजना लांडगे, संध्या देमगुंडे, अमृता ठाकूर, मनप्रितकौर कुंजीवाले, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, वैद्यकीय अधिकारी डॉ. हनुमंत रिठ्ठे यांच्यासह मनपातील इतर कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पतंजली परिवारातर्फे रामनवमीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये यज्ञविषयक जनजागृती

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड पतंजली योग परिवारातर्फे राम नवमीनिमित्त गुरुवार, दि. २६ मार्च रोजी सकाळी ७.१५ वाजता काबरा नगर श्रीकृष्ण मंदिर ठिकाणी यज्ञ संस्कार सोहळा संपन्न होणार आहे. विद्यालयीन व महाविद्यालयीन मुलांना यज्ञाचे महत्त्व सांगण्यात येणार आहे. यज्ञ का करावा व यज्ञ केल्याने काय फायदे होतात, हे मुलांना समजावून देण्यात येणार आहे व त्यांच्याकडून यज्ञ करून घेण्यात येणार आहे.

यज्ञासाठी नारायणराव कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत व पंढरीनाथ कंठेवाड, राम शिवपनोर, महारुद्र माळगे, नंदिनीताई चौधरी, सविताताई गबाळे, सुरेश लंगडापुरे, हनुमंत ढगे, महानंदा माळगे, गंगुबाई मारमपल्ले, शंकर महाजन, ऊर्मिला साजने, यादवराव भांगे, ओम कदम, शिवाजीराव शिंदे, हरिहर नरवाडे, सदाशिव बुटले पाटील, अवधूत गिरी, दिलीप माने, पंडित पाटील, दिलीप आघाव, अनिल कदम, जनार्दन आठवले, बालाजी कहाळेकर आदी पदाधिकारी व योगशिक्षक मुलांकडून यज्ञ करून घेणार आहेत. तसेच यज्ञ झाल्यानंतर श्रीरामनवमी पूजन सोहळा होणार आहे. तरी सर्व योगसाधकांनी आपापल्या मुलांना या यज्ञ संस्कार श्रीराम नवमी पूजनासाठी उपस्थित राहण्यासाठी पाठवावे, असे आवाहन पतंजली योग परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# भगवान रजनीश संबोधी दिनी सक्रिय ध्यान अभियान सोहळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** – भगवान रजनीश ब्लेसिंग मेडिटेशन कम्यून, निळा रोड येथे १ मार्च ते २१ मार्च दरम्यान सक्रिय ध्यान महाभियान आयोजित करण्यात आले होते.

दि. २१ मार्च रोजी भगवान रजनीश संबोधी दिवस संपूर्ण जगभर उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी सक्रिय ध्यान अभियानाचा समारोप सोहळा उत्साहात संपन्न झाला. दररोज सकाळी सात ते आठ दरम्यान जवळपास ३५ पेक्षा जास्त साधकांनी सक्रिय ध्यान साधना केली.

या अभियानाचे संचालन भगवान रजनीश यांच्या हस्ते पन्नास वर्षांपूर्वी संन्यासीत स्वामी गोपाळ भारती, शिबीर संचालक सुरेश धूत, माजी उपमहापौर प्रा. सुनील नेरळकर यांनी केले. ध्यान अभियान यशस्वीतेसाठी स्वामी प्रशांत, सुगंधा, प्रा. महेंद्र देशमुख, संगीता देशमुख, डॉ. अजय गव्हाणे यांनी परिश्रम घेतले. या अभियानात प्रीतम, प्रा. नारायण शिंदे, प्रा. गोविंद गव्हाणे, अलका मोरे, शामसुंदर मोतेवार, अमृता मुखेडकर, रामप्रसाद बजाज, डॉ. रवींद्र देशमुख, प्रकाश चेके, लक्ष्मीकांत वानखेडे, आनंद मुदगलकर, व्यंकटेश काळे, विजय मस्के, शिवराज कांबळे, पत्रकार आनंद कल्याणकर आदी साधकांनी सहभाग घेतला आणि ध्यान साधनेच्या लाभाविषयी मनोगत व्यक्त केले.

# मेंदूचे विकार असणाऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या आरोग्य शिबिरास २७ मार्चपासून प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्याने व जयवकील फाउंडेशन, बीजे वाडिया चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, कमल उडवाडिया फाउंडेशन, एनएच-एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई, अन्नम, एओसीएन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मेंदूचे विकार असणाऱ्या मुला-मुलींसाठी २९ वे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

शुक्रवार, दि. २७ मार्चपासून शहराच्या मगनपुरा नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद मेंदूचे विकारविषयक शिबीर घेण्यात येणार आहे, अशी माहिती राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, सदस्य बनारसीदास अग्रवाल, अंकित अग्रवाल व शाळेचे मुख्याध्यापक मधुकर मनुरकर यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली आहे.





या वर्षी शिबिराचे हे सोळावे वर्षे असून, हे एकोणतीसावे शिबीर शुक्रवार, दि. २७ व २८ मार्च या कालावधीत मगनपुरा, नवा मोंढा येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात डॉ. अनैता हेगडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात त्यांची तज्ज्ञ डॉक्टरांची टिम रुग्णावर उपचार करणार आहे. आत्तापर्यंतच्या २९ आरोग्य शिबिरात हजारो रुग्णांवर उपचार करण्यात आले. याचा तब्बल ७ हजारांपेक्षा अधिक रुग्णांना लाभ झाला आहे. नेत्रशस्त्रक्रियेमुळे दृष्टिहीन असलेल्या रुग्णांना दृष्टी मिळाली तर हाडांच्या शस्त्रक्रियेनंतर उभे राहण्यास असमर्थ असणाऱ्या रुग्णांना आता चालता येऊ लागले आहे. अनेक रुग्णांचे चालताना तोल जाणे, फिट्स येणे व ऑटीझम अशा मेंदूशी संबंधित आजारातून आरोग्य शिबिरात घेतलेल्या सातत्याने उपचारामुळे बहुतांश जणांनी आजारावर मात केली आहे तर अनेकजण उपचाराने आजारातून बरे होणार आहेत. हे आरोग्य शिबीर मेंदूचे विकार असणाऱ्या मुला-मुलींसाठी वरदान ठरले आहे. या शिबिरात उपचार घेण्यासाठी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगाना येथील राज्यातूनही मोठ्या संख्येने रुग्ण येत आहेत. प्रतिआरोग्य शिबिरात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने निवास व जेवणाची व्यवस्था करण्यात येते. प्रतिवर्षाच्या शिबिराप्रमाणे यावेळीही रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी संस्था पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन व मुख्याध्यापक यांच्या नेतृत्वात आर. आर. मालपाणी मतिमंद व श्रीरामप्रताप मालपाणी मूकबधिर विद्यालयातील कर्मचारी जय्यत तयारी करीत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com